नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ४६ * अंक ४२ * * चंद्रपूर * मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## आयोगाचे खाली डोके वर पाय

आपल्या देशातील निवडणूक आयोगाला अर्धांग वायू झाला आहे की काय, असे वाटायला लागलेले आहे. निवडणूक आयोग सरळ सरळ विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे का देत नाही. हा अजून एक जटिल प्रश्न बनलेला आहे कारण निवडणूक आयोगाने भेटीची वेळ दिली होती. त्या भेटीसाठी ३०० खासदार चालले होते मग त्या ३०० पैकी निवडणूक आयोगाने आदेश दिल्याप्रमाणे केवळ ३० प्रतिनिधी भेटायला जाणार होते. वरवर पाहिले तर निवडणूक आयोगाला विचारलेल्या प्रश्नांना सरकारी उत्तर कशाला, असे आता सारी जनता म्हणत आहे कारण सरकारच्या प्रवक्त्यांना या प्रश्नामध्ये नाक खूपसण्याची काही गरज नव्हती. पण आयोग एकाही प्रश्नाचे उत्तर द्यायला तयार नाही. विशेष म्हणजे हे सर्व जनता पहात आहे त्यामुळेच हे भारतातील निवडणूक आयोगाच्या विश्वसनीयतेवर आता जनतेतून प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. आपल्या देशातील निवडणूक आयोग आणि त्यांचा इतिहास अगदी उज्वल आहे विशेषतः आपल्यावर दीडशे वर्षे राज्य करणाऱ्या इंग्लंड या देशांमध्ये निवडणूक आयोग नावाचा प्रकार अस्तित्वातच नव्हता. ही कपोलकल्पित कथा नाही हे सत्य आहे. १९९६ सालामध्ये त्याच इंग्लंड देशांमध्ये निवडणूक आयोग स्थापन करण्यासाठी तेथील सरकारने निर्णय घेतला. त्यानंतर अशा प्रकारच्या निवडणूक आयोगाचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडचे एक मोठे शिष्टमंडळ भारतात दाखल झाले होते. कारण आपल्याच लोकशाही मानणाऱ्या देशाचा निवडणूक आयोग शिस्तबद्ध आणि निष्पक्ष आहे, जनतेच्या विश्वासाला पात्र आहे अशी त्यावेळी जगभर खात्री झाली होती. विनाकारण खुस्पटे शोधून काढणाऱ्या इंग्रजांनीच स्वतः भट देऊन त्याबाबतची ग्वाहीच दिली होती. त्यामुळे आपल्याच निवडणूक आयोगाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जगभरातील निवडणुकांचा पर्यवेक्षीय अभ्यास करण्यासाठी बरेच लोक भारतात येत होते. पण आता हा भूतकाळ झालेला आहे या भूतकाळातील अभूतपूर्व गोष्टी आता आपण दररोज बघत आहोत. सध्या तरी आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी असा प्रकार सुरू झाला आहे की काय, कारण हे आता जवळपास बऱ्याच बाबतीत दिसून येत आहे. पूर्वीही निवडणूक आयोग शंभर टक्के पक्षपात रहित होता असे नाही. पण तो कणाहीन होता असेही कधी वाटले नाही. टी एन शेषन नावाचे वादळ जेव्हा निवडणूक आयोगाच्या मुख्य पदावर आरुढ झाले आणि त्यांनी अनेक निर्णयांचा असा काही धडाका लावला की त्यामध्ये केवळ विरोधी पक्षच नाही तर सत्तारूढ पक्षातील अनेक जण घायाळ झाले होते हा इतिहास आहे. त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी निवडणूक आयुक्त शेषन यांच्या शेषनागी फण्याला चिरडण्याचा प्रयत्न अजिबात केला नव्हता हे या ठिकाणी नम्रपणे नमूद करण्याची गरज आहे. त्यानंतर आलेले आयुक्त शेषन नसले तरी, निदान त्यांच्यामध्ये शेषन यांचा उरलेला शेष अंश तरी नक्कीच जागृत होता. जगभरातून आपल्या निवडणुकांचे अवलोकन करण्यासाठी हल्ली कोणीही येत नाही. याचे कारण कोणतेही असले तरी त्याची चर्चा करण्याची गरज आम्हाला वाटत नाही. सत्तेवर असणाऱ्यांनी कोणकोणती पथ्य पाळावी याचा धडा शिकवण्यात किंवा शिकवण्यासाठी आम्ही पात्र नाही. मात्र आपला महाबलशाली निवडणूक आयोग कोणकोणते भयानक प्रयोग करीत आहेत त्याचे खुलासे होत आहेत. विशेष म्हणजे अत्यंत दुर्दैवाची गोष्ट अशी की सत्ताधारी निवडणूक आयोगाच्या बाजूने उभे आहेत. सरकारने खरे तर या प्रकाराला वेसण घातली पाहिजे. कारण हे कोणत्या क्षणी उलटणारे शस्त्र आहे. सध्याच्या सरकार मधील सामर्थ्यशाली बडे लोक नक्कीच याचा विचार करत असतील पण त्यांच्याच पक्षातील बोलघेवडे आणि नवीन आलेले वाचाळवीर आणि चोंबडे प्रवक्ते जणूकाही सरकारची आणि आयोगाची बदनामी कशी होईल यावरच भाष्य करण्यासाठी जन्मलेले दिसतात, निदान आपल्या आयोगाने तरी खाली डोके वर पाय असे वागू नये, इतकीच आमची आग्रहाची विनंती आहे...!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## मतदार पडताळणीवरून विरोधकांचा मोर्चा



पोलिसांनी रोखले अखिलेश यांची बॅरिकेडिंगवरून उडी

निदर्शनादरम्यान महिला खासदार बेशुद्ध

खा. संजय राऊत यांच्यासह अनेकांना अटक

■ **वृत्तसंस्था, डेहराडून, दि. ११ :** सोमवारी, मतदार पडताळणी आणि निवडणुकीत मत चोरीच्या आरोपांवरून संसदेतून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत ३०० विरोधी खासदारांनी मोर्चा काढला.

यादरम्यान, राहुल गांधी, प्रियंका गांधी, अखिलेश यादव यांच्यासह अनेक विरोधी खासदारांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी त्यांना संसद मार्ग पोलिस ठाण्यात नेले व २ तासांनंतर सोडण्यात आले.

निषेधादरम्यान, तृणमूल काँग्रेसच्या खासदार मिताली बाग यांची प्रकृती बिघडली आणि त्या बेशुद्ध पडल्या. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर खासदारांनी मदत केली. यापूर्वी, या मुद्द्यावर दोन्ही सभागृहात प्रचंड गोंधळ झाला आणि कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. जे दुपारी २ वाजता पुन्हा सुरू झाले.

संसदेच्या मकरद्वार येथून मोर्चा सुरू झाला. खासदारांच्या हातात 'सेव्ह व्होट'चे बॅनर होते. तथापि, दिल्ली पोलिसांनी सांगितले होते की इंडिया ब्लॉकने मोर्चासाठी कोणतीही परवानगी मागितली नव्हती, म्हणून निवडणूक आयोगाकडे जाण्यापूर्वी, वाहतूक भवनाजवळ बॅरिकेड्स लावून मोर्चा थांबवण्यात आला.

नंतर अखिलेश यांनी बॅरिकेड्स ओलांडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. जेव्हा खासदारांना पुढे जाण्याची परवानगी देण्यात आली नाही, तेव्हा ते जमिनीवर बसले. प्रियंका, डिंपल यांच्यासह अनेक खासदार 'वोट चोर गड्डी छोड'च्या घोषणा देत असल्याचे दिसून आले.

इंडिया आघाडीच्या वतीनेकाढण्यात आलेल्या मोर्चात ३०० खासदार सहभागी झाले असून, महाराष्ट्रातील काही खासदारांचा समावेश होता. या शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांसह अनेकांना अटक करण्यात आली. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून विरोधकांची मुस्कटदाबी सुरू असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. आमची ही लढाई शांततेच्या मार्गाने सुरू राहील, असे सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले. तर आम्ही मोर्चावर ठाम असून, आम्हाला आंदोलन करण्याचा अधिकार असल्याचे खासदार नीलेश लंके म्हणाले. बिहारमध्ये होणाऱ्या निवडणूक याद्यांच्या विशेष सघन सुधारणा आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदार फसवणूक झाल्याच्या आरोपांविरुद्ध निषेध करण्यासाठी संसदेपासून भारतीय निवडणूक आयोगापर्यंत मोर्चा काढण्यात आला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यासह इंडिया आघाडीतील अनेक नेते सामील झाले होते.

## दर्शनाला जाणारी पिकअप व्हॅन उलटली

# ९ महिला ठार, ३५ जखमी

### श्रावणी सोमवार ठरला घातवार : पीएम निधीतून २ लाखांची मदत

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ११ :** पुणे जिल्ह्यातल्या कुंडेश्वर येथे महादेवाच्या दर्शनाला जाणारी पिकअप व्हॅन उलटून ९ महिला भाविकांचा मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी घडली. या अपघातामध्ये जवळपास ३५ भाविक जखमी झाल्याचे समजते.

अपघाताची दखल पंतप्रधान कार्यालयाने घेतली असून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

पुणे जिल्ह्यात पाईट नावाचे गाव आहे. येथील कुंडेश्वर मंदिर प्रसिद्ध आहे. पुण्यापासून साधारणतः दीड तासाच्या अंतरावर निसर्गरम्य ठिकाणी हे मंदिर असून, येथे भाविकांची मोठी गर्दी असते. श्रावणी सोमवारचे निमित्त साधून आज सकाळी ११ च्या सुमारास भाविकांची एक व्हॅन कुंडेश्वर येथे निघाली होती. मात्र, चालकाचे भरधाव वेगात असलेल्या वाहनावरील नियंत्रण सुटून ते दरीत कोसळले. रस्त्यावर रहदारी असल्याने तातडीने स्थानिकांनी खासगी वाहने व १० हून अधिक अॅम्ब्युलेन्सद्वारे अपघातग्रस्त महिलांना रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच ७ महिलांचा जागीच मृत्यु झाला , तर दोन जणींचा रुग्णालयात नेताना वाटेतच मृत्यू झाला.

**मृतांची संख्या वाढण्याची भीती**

अपघात भीषण असून मृतांची संख्या वाढू शकते, असे पाईटचे माजी सरपंच जयसिंग दरेकर यांनी स्पष्ट केले. जखमींमध्ये गंभीर असणाऱ्यांचे प्रमाण देखील लक्षणीय असल्याने त्यांना मोठ्या रुग्णालयात हलवण्यात येत आहे.

घाट चढताना अचानक व्हॅन मागे आली. त्यामुळे ही घटना घडल्याचे समजते.

**मृतांची नावे**

शोभा ज्ञानेश्वर पापड़
सुमन कालूराम पापड़
शारदा रामदास चोरगे
मंदा कनिफ दरेकर
संजीवनी कैलास दरेकर
मीराबाई संभाजी चोरगे
बयदाबाई नयनेश्वर दरेकर
शकुंतला तानाजी चोरगे

अपघातामधील मृत आणि जखमी भाविक पापळवाडी येथील असल्याचे समजते.

**शासन त्यांच्या पाठीशी**

अजित पवार यांनी ट्वीट करत म्हटले की, अपघात अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. जखमींना तातडीनं उपचार मिळावेत तसंच अपघातग्रस्तांना सर्वतोपरी मदत करण्यात यावी, यासाठी प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कठीण प्रसंगात शासन त्यांच्या सोबत ठामपणे उभे आहे.



**पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख**

अपघाताची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यालयाने घेतली असून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. पीएमओने ट्विट करत म्हटले, पुणे येथे झालेल्या अपघातातील जीवितहानीमुळे दुःख झाले आहे. या दुर्घटनेत आपले जिवलग गमावलेल्या सर्वांप्रति शोकसंवेदना. जखमी लवकर बरे होवोत अशी प्रार्थना. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख रुपये दिले जातील. जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये दिले जातील.

## बँकेतून १४ कोटींचे सोने आणि ५ लाख रोकड लुटली

जबलपूरमध्ये सशस्त्र दरोडा

■ **वृत्तसंस्था, जबलपूर, दि. ११ :** मध्य प्रदेशातील जबलपूरपासून ५० किमी अंतरावर असलेल्या खिटोला परिसरात सोमवारी सकाळी ११ वाजता सशस्त्र दरोडेखोरांनी बँक लुटली. दरोडेखोरांनी बँक कर्मचाऱ्यांना बंदुकीचा धाक दाखवला. त्यानंतर १५ मिनिटांत १४ किलो ८०० ग्रॅम सोने आणि ५ लाख ७० हजार रुपये रोख घेऊन पळून गेले.

लुटलेल्या सोन्याची अंदाजे किंमत १४.५ कोटींहून अधिक आहे. पोलिसांनी जिल्ह्यात नाकाबंदी केली आहे. कटनी, मांडला, दिंडोरीसह संपूर्ण जबलपूरच्या पोलिसांना सतर्क करण्यात आले आहे. ही घटना इसाफ स्मॉल फायनान्स बँकेत घडली. सहा तरुण तीन बाईकवरून येथे आले. गोळीबार करण्याची धमकी देत त्यांनी हा डल्ला मारला.

## शिंदे गटाच्या बैठकीत राडा



■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. ११ :** नाशिक येथे शिवसेना शिंदे गटाच्या उत्तर महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत जोरदार राडा झाल्याची माहिती आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचा आढावा पूर्ण झाल्यानंतर शिंदे गटातील दोन गटांमध्ये वाद विकोपाला गेले व त्यातून उपस्थित पदाधिकाऱ्यांनी एकमेकांची कॉलर पकडत शिवीगाळ केल्याचे समजते. यामुळे सभागृहात गोंधळ निर्माण झाला होता.

शिवसेना शिंदे गटाच्या उत्तर महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मंत्री उदय सामंत, दादा भुसे आणि खासदार राहुल शेवाळे हॉटेलमध्ये उपस्थित होते. या बैठकीच्या वेळी दोन गटात जोरदार राडा झाला.

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा पदाधिकारी बैठकीत शिरल्याचा आरोप करत दोन गट आपापसात भिडले. घटनास्थळी उपस्थित पोलीस आणि सुरक्षा रक्षकांनी तातडीने हस्तक्षेप करत वाद शांत करण्याचा प्रयत्न केला. या घटनेचे काही व्हिडिओ देखील समोर आले आहेत.

या प्रकरणावर मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, ज्या व्यक्तीच्या समर्थकांनी हे केले, त्याची दखल घेतली आहे. पक्षाकडून त्यांची गय केली जाणार नाही. या घटनेचा आढावा शिंदे यांना देणार आहे. किरकोळ वाद आहे, गैरसमजामधून हे झाले आहे. स्वतःच्या प्रसिद्धसाठी त्यांनी बैठकीतील सांगणे हे उचित नाही. आम्ही त्यांना समज दिली असल्याचे सामंत म्हणाले.


### सैन्याच्या कायदेशीर विंगमधील

## आरक्षण धोरण रद्द

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :** पुरुष आणि महिला अधिकाऱ्यांसाठी २:१ च्या प्रमाणात आरक्षण देण्याच्या भारतीय लष्कराच्या धोरणाला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी रद्दबातल ठरवले.

जेएजी ही लष्कराची कायदेशीर शाखा आहे, जिथे अधिकारी कायदेशीर सल्ला देतात, कोर्ट-मार्शल केसेस देतात आणि सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कायदेशीर गरजा पूर्ण करतात. दोन महिला उमेदवारांच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले की, हे धोरण मनमानी आहे आणि संविधानानुसार सर्वांना दिलेल्या समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करते.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, सरकार फक्त पुरुषांसाठी जागा आरक्षित ठेवू शकत नाही. महिलांसाठी जागा मर्यादित करणे चुकीचे आहे. खऱ्या लिंग तटस्थतेचा अर्थ असा आहे की सर्वात पात्र उमेदवाराची निवड केली जाते. प्रत्यक्षात, गुणवत्ता यादीत दोन महिला उमेदवार चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर होत्या, परंतु महिलांसाठी फक्त ३ जागा असल्याने त्यांना संधी मिळाली नाही. तर त्यांच्यापेक्षा कमी गुण असलेल्या पुरुष उमेदवारांची निवड झाली. न्यायालयाने एका याचिकाकर्त्याला तात्काळ सेवेत सामावून घेण्याचे आदेश दिले, तर दुसऱ्या याचिकेदरम्यानच तो नौदलात सामील झाला असल्याने त्याला दिलासा मिळाला नाही. न्या. मनमोहन आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने म्हटले की, गेल्या काही वर्षांत महिलांना मिळालेल्या कमी संधींची भरपाई करण्यासाठी किमान ५०% जागा महिलांना देण्यात याव्यात.



## आयोग वगळलेल्या मतदारांची यादी जाहीर न करून कुणासाठी काय लपवत आहे?



### रोहित पवारांचा सवाल

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मतदार याद्यांमधील कथित गैरप्रकारावरून निवडणूक आयोगाचा खरपूस समाचार घेतला आहे. या प्रकरणी त्यांनी आयोगाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांना बजावण्यात आलेली नोटीस म्हणजे 'गिरे तो भी टांग उपर' सारखी असल्याचा आरोप केला आहे. निवडणूक आयोगाने सुप्रीम कोर्टात मतदार यादीतून वगळलेल्या मतदारांची यादी जाहीर न करण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. असे करून आयोग काय व कुणासाठी लपवत आहे? असा खडा सवालही त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. बिहार विधानसभेची निवडणूक लवकरच होणार आहे. या हिंदी भाषिक राज्यात मतदार यादींच्या फेरतपासणीवरून मोठे रान पेटले आहे. निवडणूक आयोगाने येथील लाखो मतदारांची नावे मतदार यादीतून वगळले आहेत. या प्रकरणी आयोगाने सुप्रीम कोर्टात एक प्रतिज्ञापत्र दाखल करून वगळलेल्या मतदारांची यादी जाहीर करण्यास आपण बांधिल नसल्याचे सांगितले आहे.

# भाजपचा निवडणूक आयोगाद्वारे मतांवर डल्ला



### हर्षवर्धन सपकाळ यांचा गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ११ :

सत्ताधारी भाजप निवडणूक आयोगाच्या मदतीने सर्वसामान्य जनतेच्या मतांवर डल्ला मारत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी केला. काँग्रेस पक्षाला गळती लागली हा केवळ सत्ताधाऱ्यांचा कांगावा आहे. उलट भाजपच सध्या काँग्रेसयुक्त झाला आहे, असे ते म्हणालेत.

पुण्यातील खडकवासला येथील सोरीना रिसॉर्टमध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने 2 दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी सकाळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून 300 हून अधिक काँग्रेसचे माजी मंत्री, खासदार, आमदार, पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित राहिले आहेत. या कार्यशाळेत पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार असून, पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याला प्रशिक्षित केले जात आहे.

यावेळी पत्रकारांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, "काँग्रेस पक्षाला गळती लागली हा सत्ताधाऱ्यांचा कांगावा आहे. काँग्रेस विचारधारा असणारा पक्ष आहे. सध्या भाजप काँग्रेस युक्त झाली आहे. सध्या निवडणुकीत विरोधकांच्या मतांची चोरी सुरू झाली आहे. विविध विधानसभा निवडणुकांत ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. भाजप निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतांवर डल्ला मारत आहे."

सपकाळ यांनी यावेळी सत्ताधारी पक्षांमध्ये टोळी युद्ध सुरू झाल्याचाही दावा केला. तसेच भाजप राज्यात दंगली घडवून आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. "राज्यात भाजप कबुतर जिहाद आणू पाहत आहे. सर्वांना जिवंत राहण्याचा अधिकार आहे. त्यांच्या या अधिकाराचे हनन होता कामा नये. पण सत्ताधारी यामध्ये गोंधळ निर्माण करत आहेत. सत्ताधारी पक्षाने राज्यात दंगा करू पथक स्थापन केले आहे," असे ते म्हणाले.

## अॅम्ब्युलन्स अडकल्याने महिलेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :

ठाणे-घोडबंदर महामार्गावर सुरू असलेल्या खड्डे दुरुस्तीमुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीने आणखी एका महिलेचा बळी घेतला. पालघर जिल्ह्यातील सफाळे (मधुकर नगर) येथील छाया कौशिक पुरव यांना घेऊन जाणारी अॅम्ब्युलन्स मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विरार-वसई ते घोडबंदरपर्यंतच्या प्रचंड वाहतूक कोंडीत अडकली. यामुळे त्यांना वेळेवर उपचार मिळू शकले नाहीत आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

छाया पुरव या मूळच्या पालघर जिल्ह्यातील सफाळे येथील होत्या, पण मुंबईतील माहीम कोळीवाडा येथे राहत होत्या. ३० जुलै रोजी सुट्टीसाठी त्या आपल्या गावी आल्या होत्या. त्यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळेजवळ झाडांच्या फांद्या कापण्याचे काम सुरू असताना अचानक एक झाड कोसळले आणि त्या गंभीर जखमी झाल्या. सुरुवातीला त्यांना पालघरमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती अधिक गंभीर झाल्याने कुटुंबीयांनी त्यांना मुंबईतील एका खासगी रुग्णालयात हलवण्याचा निर्णय घेतला.

मुंबईकडे जात असताना घोडबंदर महामार्गावर दुरुस्ती कामांमुळे प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती, त्यामुळे अॅम्ब्युलन्सला अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागला. प्रकृती अधिक बिघडल्याने त्यांना तात्काळ मिरा रोड येथील ऑर्बिट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. जर अॅम्ब्युलन्स वेळेत पोहोचली असती, तर छाया पुरव यांचे प्राण वाचले असते, असा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या दुर्दैवी घटनेमुळे स्थानिक लोकांमध्ये तीव्र संताप असून, महामार्गावरील दुरुस्तीच्या कामांचे नियोजन आणि वाहतूक व्यवस्थापनावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## ओबीसींच्या हक्काचे आरक्षण घेणारे 'टगे'
## लक्ष्मण हाके यांचा घणाघात



**मुंबई :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पुन्हा एकदा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्यावर हल्ला चढवला आहे. या प्रकरणी त्यांनी जरांगे यांचा उल्लेख लबाड कोल्हा, तर ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाची मागणी करणाऱ्या मराठा समाज व त्यांच्या नेत्यांचा उल्लेख 'टगे' म्हणून केला आहे. त्यांच्या या विधानाचे राज्याच्या राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समुदायाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासाठी ते येत्या 29 ऑगस्टपासून मुंबईत आंदोलन करणार आहेत. त्यांच्या आंदोलनामुळे राज्याचे राजकारण तापले असताना ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी त्यांच्यावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, हे लोक आता ओबीसींचे आरक्षण घेऊन निवडणुकीला उभे राहणार आहेत. फुले - शाहू - आंबेडकरांनी सामाजिक न्यायासाठी गावगाड्यातील प्रत्येक माणसाला मानसन्मान मिळवून देण्यासाठी आरक्षण दिले.

## शिवसेनेची महारक्तदान यात्रा
### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सहभाग




■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :

ऑपरेशन सिन्दूरच्या यशानंतर भारतीय सैन्यदलाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शिवसेनेने (शिंदे) महारक्तदान यात्रेचे श्रीनगर येथे रविवारी आयोजन केले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सैन्यदलाच्या रुग्णालयास भेट देऊन स्वतः रक्तदान केले.

सांगली येथील शिवसेनेचे चंद्रहार पाटील यांनी सिंदूर महारक्तदान यात्रे च्या आयोजनासाठी पुढाकार घेतला आहे. सांगली जिल्ह्यातील एक हजार पैलवान यात्रेमध्ये सहभागी आहेत. सैन्यदलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांनी श्रीनगर येथील रक्तदानामध्ये भाग घेतला. उपमुख्यमंत्री शिंदे रविवारी सकाळी श्रीनगरमध्ये दाखल झाले. त्यांनी सैन्यदलाच्या ९२ बेस रुग्णालयास भेट देऊन रक्तदान केले. सैन्यदलाच्या अधिकाऱ्यांनी शिंदे यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित केले. तुम्ही इथे दक्ष असता म्हणून आम्ही सुखाने जगू शकतो असे शिंदे यावेळी म्हणाले.

## १२ वर्षाच्या बांगलादेशी मुलीवर तीन महिने २०० पुरुषांकडून बलात्कार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :

मीरा-भाईंदर पोलिसांच्या मानव तस्करी विरोधी पथकाने एका 12 वर्षांच्या बांगलादेशी मुलीची वेश्याव्यवसायाच्या जाळ्यातून सुटका केली आहे. ही मुलगी शाळेच्या परीक्षेत नापास झाल्यामुळे घरातून पळून गेली होती, त्यानंतर तिला मानवी तस्करीच्या क्रूर जाळ्यात अडकवण्यात आले. या दरम्यान, या अल्पवयीन मुलीवर तीन महिन्यांत तब्बल 200 हून अधिक पुरुषांनी बलात्कार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

26 जुलै रोजी दोन स्वयंसेवी संस्था आणि मीरा-भाईंदरच्या मानव तस्करी विरोधी पथकाने वसईजवळच्या नायगाव परिसरात संयुक्त मोहीम राबवली. नायगाव (पूर्व) येथील एका इमारतीत छापा टाकून केलेल्या या कारवाईत पोलिसांनी एका 12 वर्षीय अल्पवयीन बांगलादेशी मुलीची आणि एका 20 वर्षीय महिलेची सुटका केली. त्याचवेळी, मोहम्मद खालिद बापरी, जुबेर शेख आणि शमीन सरदार या तीन बांगलादेशी आरोपींना अटक करण्यात आली.

हार्मोनी फाउंडेशनचे अध्यक्ष अब्राहम मथाई यांच्या माहितीनुसार, ही 12 वर्षांची मुलगी परीक्षेत नापास झाल्यामुळे घाबरून घरातून पळून गेली होती. त्यानंतर, तिच्याच गावातील 'मीम' नावाच्या एका महिलेने तिला आमिष दाखवून बांगलादेशातून बेकायदेशीरपणे कोलकात्याला आणले. तिथे तिचे बनावट आधार कार्ड बनवून, नंतर तिला विमानाने मुंबईत आणले आणि नायगावमध्ये डांबून ठेवले.

'हार्मनी फाउंडेशन'ने दिलेल्या निवेदनानुसार, पीडित मुलीला नायगावमध्ये एका वृद्ध व्यक्ती आणि त्याच्या पत्नीसोबत इतर 7-8 मुलींसोबत अनेक दिवस डांबून ठेवण्यात आले होते. एके दिवशी तिथे त्या वृद्ध व्यक्तीने तिला इंजेक्शन देऊन तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर तिला अनेक अनोळखी पुरुषांसमोर विकले गेले. तिला ड्रग्जचे इंजेक्शन देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले जात होते.

हार्मोनी फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष अब्राहम मथाई यांनी सांगितले की, मुलीला प्रथम गुजरातमधील नाडियाद येथे नेण्यात आले होते आणि तीन महिन्यांच्या कालावधीत 200 हून अधिक पुरुषांकडून लैंगिक शोषण झाले. ती अद्याप किशोरावस्थेत पोहोचलेली नाही, तरीही देह व्यापारातील राक्षसांनी तिचे बालपण हिरावून घेतले. या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणीही मथाई यांनी केली आहे.

## महायुतीच्या घटकपक्षांत वाट्यावरून भांडण
## विजय वडेट्टीवार यांचा आरोप



**पुणे :** काँग्रेस नेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांत सध्या आपापल्या हिश्श्याचे वाटे घेण्यासाठी कलगीतुरा रंगल्याचा आरोप केला. सत्ताधारी महायुतीमधील तिन्ही घटकपक्ष सत्तेच्या वाट्यासाठी भांडत आहेत. या पक्षांना व त्यांच्या नेत्यांना सध्या जनतेचे नव्हे तर आपल्या वाट्याचेच पडले आहे, असे ते म्हणालेत. पुण्यात आजपासून काँग्रेस कार्यकर्त्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेला सुरुवात झाली आहे. या निमित्ताने पत्रकारांशी संवाद साधताना विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर उपरोक्त आरोप केला. ते म्हणाले, राज्य सरकारमध्ये सध्या कोल्ड वॉर अर्थात शीतयुद्ध सुरू आहे.

## रक्षाबंधन निमित्त द चिल्ड्रन एड संस्थेस महिला बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांची भेट

**मुंबई :** अनेक दशकांपासून बालकल्याणासाठी समर्पित असलेल्या माटुंगा येथील द चिल्ड्रन एड संस्थेस महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी भेट देत पाहणी करून कामकाजाची माहिती जाणून घेतली. यावेळी संस्थेतील मुलांसोबत संवाद साधत त्यांच्या सहवासात रक्षाबंधन साजरी करण्याचा विशेष आनंद लाभला असल्याच्या भावना मंत्री तटकरे यांनी यावेळी व्यक्त केल्या. अनेक वर्षापासून कार्यरत असलेली ही संस्था बालकांना शिक्षण, कला, नृत्य आणि विविध उपक्रमाद्वारे प्रगतीची संधी उपलब्ध करून देत आहे. तसेच विविध सुविधांसह बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करत असल्याचे अनुभवायला मिळाले असल्याचेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी त्यांनी मुलांना राख्या बांधल्या, मुलांशी संवाद साधला, मुलांनी बनविलेल्या विविध वस्तुंचे कौतुक केले. माटुंगा येथे असलेल्या द चिल्ड्रन एड संस्थेत मुलांना औपचारिक शिक्षण, तसेच एसएससीनंतरचा अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येते. तसेच कौशल्य शिक्षण, तज्ज्ञ मानसशास्त्रज्ञ आणि मनोवैज्ञानिक या संस्थेमध्ये नियमित भेट देतात तसेच विशेष वैद्यकीय सुविधाही मुलांना उपलब्ध करून देण्यात येतात.

## जगातील सर्वात मोठा एक्टॉपिक थायरॉइड ट्यूमर रोबोटिक ऑपरेशनने काढला

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :

पुण्यातील सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी एका दुर्मिळ आणि उच्च-जोखीम असलेल्या केसमध्ये प्रगत रोबोटिक-सहाय्यित शस्त्रक्रियेद्वारे ६२ वर्षीय महिलेच्या छातीतून आतापर्यंतचा सर्वात मोठा एक्टॉपिक थायरॉइड ट्यूमर यशस्वीरित्या काढला. हा जगातील सर्वात मोठा एक्टॉपिक थायरॉइड ट्यूमर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

रुग्णाच्या छातीतला हा ट्यूमर १७ ७ १२ ७ ११ सेमी आकाराचा आणि ८०० ग्रॅम वजनाचा होता. त्याचे निदान दुर्मिळ एक्टोपिक थायरॉइड गोइटर म्हणून झाले. ही अत्यंत दुर्मीळ स्थिती आहे, जिथे थायरॉइड ग्रंथी चुकीच्या ठिकाणी विकसित होते. मानेतील सामान्य थायरॉईड ग्रंथीशी तिचा कोणताही संबंध नसतो. अशा केसेस अत्यंत असामान्य असून १००,००० ते ३००,००० व्यक्तींपैकी फक्त एका व्यक्तीमध्ये दिसून येतात.

सह्याद्री हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टरांच्या बहुविद्याशाखीय टीमने ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. या टीममध्ये सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. विनोद गोरे, लॅपरोस्कोपिक व रोबोटिक सर्जन डॉ. संजय कोलते आणि डॉ. फुलचंद पुजारी यांचा समावेश होता. त्याचबरोबर कार्डिओथोरेसिक सर्जन डॉ. स्वप्निल कर्णे, भूलतज्ञ डॉ. विकास कर्णे आणि डॉ. बालाजी मोमले यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.



रुग्ण प्रथम छातीत जडपणाच्या तक्रारी घेऊन आली होती. स्कॅनमध्ये छातीच्या मध्यभागी, हृदय, श्वासनलिका आणि प्रमुख रक्तवाहिन्या असलेल्या भागात मोठा ट्यूमर दिसून आला. ही केस अपवादात्मक होती कारण तिच्या मानेतील थायरॉइड ग्रंथी पूर्णपणे सामान्य होती.

## चेंबूरमधील बाटा शोरुमला भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

चेंबूर येथील मल्हार हॉटेलनजीकच्या शीव आशिष इमारतीतील २ हजार चौरस फूट जागेतील बाटाच्या दुकानाला सोमवारी पहाटे साडेचारच्या सुमारास भीषण आग लागली. या दुर्घटनेत शोरुममधील चपला, बुटांसह अन्य वस्तूंचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने दुर्घटनेत कोणीही जखमी झाले नाही.

दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य हाती घेतले. तसेच, अदानी इलेक्ट्रिसिटी व संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचारी, पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. शीव आशिष या औद्योगिक इमारतीतील तळमजल्यावरील बाटा शोरुममध्ये आग लागली होती. काहीच वेळात आग तळघरापर्यंत पसरली. आगीची वाढती तीव्रता लक्षात घेऊन अग्निशमन दलाने आग भीषण स्वरूपाची असल्याचे घोषित केले. प्रयत्नांची पराकाष्ठा करत सकाळी ७ वाजून ५० मिनिटांनी आग विझविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. आगीमुळे शोरुममधील विद्युत यंत्रणा, विजेच्या तारा, चप्पल - बुट, बॉक्स, कागदपत्रे आदी वस्तू जळून खाक झाल्या. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित सफर
## बेरोजगारांसाठी सोन्याची संधी

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ११ :

मुंबई,: शालेय (स्कूल) बसचे वाढीव मासिक दर परवडत नसल्याने आपल्या मुलांच्या वाहतुकीसाठी अनाधिकृत रिक्षाचा पर्याय निवडणाऱ्या राज्यातील पालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने धाडसी पावले टाकली आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करण्यात येत आहेत. या बाबतची अधिसूचना निर्गमित होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

सरनाईक म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीला प्रथम प्राधान्य आहे. सुरक्षित वाहतुकीसह बेरोजगारांना रोजगाराची संधी देण्यासाठी स्कूल व्हॅनला मंजुरी देण्यात येत आहे. नव्या स्कूल व्हॅनमधून विद्यार्थी वाहतुकीचा व्यवसाय सुरू करणाऱ्यांना राज्य शासनाकडून परवाने देण्यात येतील. राज्यात अत्याधुनिक सुरक्षा सुविधांनी युक्त स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

परिवहन विभागाने बोलावलेल्या पालक आणि बस संघटना प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनधिकृत वाहनांतून विद्यार्थी वाहतूक होत असल्याचा मुद्दा गाजला होता. देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतुकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा (ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्ड्स अर्थात एआयएस-०६३) आधार घेऊन अद्ययावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली (एआयएस-२०४ ) तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला शालेय (स्कूल) व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे. सदर वाहने इर-श्क या श्रेणीतील असणार आहेत. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश केला आहे.

## बेल्जियममध्ये गणेशोत्सवात होणार 'दगडूशेठ' गणपतीची प्रतिष्ठापना

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ११ :

गणपती बाप्पा मोरया आणि श्रीमंत दगडुशेठ गणपती की जयचे जयघोष आता बेल्जियममध्येही निनादणार आहेत. महाराष्ट्र मंडळ बेल्जियम आणि शिरीष वाघमारे यांच्या पुढाकाराने बेल्जियममध्ये दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवात यंदा प्रथमच श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपतीच्या प्रतिकृतीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

ही अडीच फूट उंचीची मूर्ती पुण्यातील मंदिरात विधिवत पूजन करून नुकतीच महाराष्ट्र मंडळ बेल्जियमच्या सदस्यांकडे ट्रस्टतर्फे सुपूर्द करण्यात आली. या कार्यक्रमात उपक्रमाचे संयोजक शिरीष वाघमारे, तृप्ती वाघमारे, ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, राजाभाऊ पायमोडे आणि रोहित लोंढे उपस्थित होते. पुण्यामध्ये ही मूर्ती सुभाषनगरमधील श्री नटराज आर्टचे भालचंद्र उर्फ लाला देशमुख व राजेंद्र देशमुख यांनी साकारली.



शिरीष वाघमारे, तृप्ती वाघमारे यांसह इतर सदस्यांनी ही मूर्ती स्वीकारली. जगातील १७५ देशांमध्ये गणेशोत्सव साजरा होत असून बेल्जियममधील भारतीयांचा उत्साह वाखाणण्यासारखा आहे.

शिरीष वाघमारे म्हणाले, "श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती बाप्पाचे बेल्जियममध्ये आगमन हा महाराष्ट्र मंडळ बेल्जियमचा अभिमानाचा क्षण आहे. यामुळे परदेशात राहणाऱ्या भारतीय आणि महाराष्ट्रीय बांधवांसाठी गणेशोत्सवाचा आनंद घेता येणार आहे. यानिमित्ताने श्रद्धा आणि संस्कृतीचा सुवास थेट महाराष्ट्रातून बेल्जियममध्ये पोहोचणार आहे." महेश सूर्यवंशी यांनी सांगितले की, "आता विश्वात्मके देवे, हे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचे वाक्य खऱ्या अर्थाने साध्य होत आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती हे जगभरातील गणेशभक्तांचे श्रद्धास्थान आहे." बेल्जियममध्ये जवळपास अडीच हजार मराठी बांधव सक्रिय असून २० ते २५ हजार भारतीय नागरिक उत्सवात सहभागी होतात. लोकमान्य टिळकांची समाज एकसंध होण्याची भावना भारतासह परदेशातही घडत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला.

## अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

मुंबईत एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपींनी या मुलीला ब्लॅकमेलिंग करून तिच्यावर अत्याचार केला. दक्षिण मुंबईतील काळाचौकी परिसरात ही घटना घडली असून, अत्याचार करणारे पाचही आरोपी स्वतः अल्पवयीन असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी पीडित मुलीचे अश्लील व्हिडीओ चित्रीत केले होते. ते व्हिडिओ दाखवून तिला धमकावत तिच्यावर गेल्या काही महिन्यांपासून अत्याचार करत होते. ब्लॅकमेलिंगच्या भीतीमुळे ती या अत्याचाराला बळी पडत होती. सततच्या या अत्याचाराला कंटाळून अखेर मुलीने तिच्या कुटुंबीयांना सर्व प्रकार सांगितला. मुलीने घडलेला सर्व प्रकार सांगितल्यानंतर, मुलीच्या आईने तातडीने काळाचौकी पोलिस गाठत याप्रकरणी तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच पोलिसांनी गुन्हा नोंदवत सर्व आरोपींना ताब्यात घेतले असून, सर्वांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, त्यांची ओळख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. धक्कादायक बाब म्हणजे, पीडितेवर अत्याचार करणारे पाचही तरुण अल्पवयीन असल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण असून, नागरिक आरोपींवर कठोर कारवाईची मागणी करत आहेत. पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

## ट्रॅक्टरला जीपीएस, ब्लॅक बॉक्स लावण्याच्या केंद्राच्या निर्णयाला विरोध

■ महासागर प्रतिनिधी
कोल्हापूर, दि. ११ :

केंद्र सरकार ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला जीपीएस आणि ब्लॅक बॉक्स बसवण्याचा विचार करत आहे. परंतु, या निर्णयाला कोल्हापुरातून जोरदार विरोध होत आहे. काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी यासंदर्भात पत्रकार परिषद घेऊन या कायद्याला हरकत नोंदवण्याचे आवाहन केले आहे. हा कायदा लागू होण्याआधीच त्यावर आक्षेप घ्यावा, असे ते म्हणाले. गरज पडल्यास ट्रॅक्टर मोर्चा काढण्याचा इशाराही त्यांनी दिला. राज्य सरकारनेही या विषयावर आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही त्यांनी केली. केंद्र सरकारने या संदर्भात एक अधिसूचना काढली आहे, ज्यानुसार पोस्ट किंवा ईमेलद्वारे हरकती नोंदवता येतील. वेळ कमी असल्याने जास्तीत जास्त लोकांनी आपल्या हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन सतेज पाटील यांनी केले आहे.

सतेज पाटील म्हणाले, ट्रॅक्टरला ब्लॅक बॉक्स बसवण्याची आयडिया कोणाच्या डोक्यातून आली हे कळायला मार्ग नाही. लोकांना आधीच हमीभाव नाही. त्यामध्ये आता हा 25000 पर्यंत आर्थिक बोजा पडणार आहे. त्यामुळे आम्ही ईडीआर आणि जीपीएस बनवणारी कोणती कंपनी आहे का? याबाबत माहिती घेतली पण अद्याप त्याची माहिती मिळाली नाही. ते म्हणाले की या निर्णयावर अधिसूचना काढण्यात आली आहे. ते पुढे म्हणाले की ईडीआर आणि जीपीएस ट्रॅक्टरवर लावायची काही गरज आहे का? 18 तारखेपर्यंत सर्व शेतकऱ्यांनी हरकती नोंदवाव्यात असे आवाहन त्यांनी केले.



### शेतकऱ्याच्या खिशावर दरोडा, सतेज पाटलांचा हल्लाबोल

ते म्हणाले की निर्णय होण्यापूर्वीच हरकती व्हाव्यात याबाबत आम्ही आवाहन करत आहोत. हा विषय देशव्यापी असल्याने आम्ही आतापासून शेतकऱ्यांना आवाहन करत आहे. पुढे बोलताना सतेज पाटील म्हणाले, दिल्लीत एसी कार्यालयात बसून शेतकऱ्यांसाठी कायदे बनवणाऱ्यांना शेती आणि शेतकऱ्याच्या व्यथा कळत नाहीत.

## पाटबंधारे कार्यालयात वृक्ष लागवड

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ ऑगस्ट :** पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग क्र. २ चंद्रपूर तसेच पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग आलापल्ली मु.चंद्रपूर यांचे संयुक्त विद्यमाने कार्यालय परिसरात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम दि.३१ जुलैला पार पडला. वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरवात कार्यकारी अभियंता रविंद्र वऱ्हाडे व उपकार्यकारी अभियंता योगेश जामकर यांचे हस्ते करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी वृक्षाचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमासाठी विदर्भ पाटबंधारे कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे पालक संचालक तथा वरिष्ट लिपिक गणेश गेडेकर उपस्थित होते.

## बल्लारपूर शहरात सावन मेळा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**बल्लारपूर, दि. ११ ऑगस्ट :** शहरातील प्रतिष्ठित सामाजिक सेवा संस्था रणरागिनी हिरकणी फाउंडेशनने २ ऑगस्ट रोजी संत तुकाराम हॉल येथे भव्य 'सावन मेळा' आयोजित केला होता. या कार्यक्रमात शहरातील २०० हून अधिक महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमात सावन क्वीन, जुळी जोडी, ग्रुप डान्स तसेच मनोरंजक खेळ अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. ग्रुप डान्समध्ये नटराज ग्रुपला प्रथम क्रमांक, बीएचआर ग्रुपला द्वितीय क्रमांक आणि पंजाब क्वीन्सला तृतीय क्रमांक मिळाला. सावन क्वीन स्पर्धेत तेजस येगिनवार प्रथम क्रमांक, प्रीती कथोड द्वितीय क्रमांक पटकाविला.

# घुग्घूस शहरातील एका बंद घरात ११९ विविध जाती धर्माचे मतदार ?

### ग्रामीण भागातही मतदार यादीत प्रचंड घोळ व वोट चोरीचा प्रकार उघड ?, घुग्घुस येथील काँग्रेस जनसंपर्क कार्यालयात घेतली पत्रपरिषद

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ११ ऑगस्ट :** महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचे आश्चर्यकारक निकाला नंतर महाराष्ट्रातील तसेच देशातील जनतेचे EVM व निवडणूक आयोग यांच्या कार्यप्रणालीवर संशय निर्माण झालेला आहे. लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादीचे सहा महिणे अभ्यास केल्या नंतर पत्रकार परिषदेत निवडणूक आयोग हा भारतीय जनता पक्षाला निवडणुकीत विजयी करण्यासाठी मदत करीत असून वोट चोरीचा आरोप प्रत्यक्ष पुराव्यासह देशाला दाखवून दिले आहेत. राहुल गांधी यांच्या भंडाफोड नंतर घुग्घूस काँग्रेस



शहर अध्यक्ष व काँग्रेस नेते यांनी घुग्घुस शहरातील तसेच ग्रामीण भागातील मतदार यादी तपासणी केली असता अनेक त्रुटी अनेक भोंगळ कारभार त्यांच्या निदर्शनास आले आहेत.

घुग्घूस शहरातील केमिकल वॉर्डातील सध्यास्थीतीत बंद असलेले घर क्रं ३५० हे सचिन बांदूरकर यांच्या मालकीचे असून या घरात विविध जाती धर्माचे आडनावाचे जवळपास ११९ मतदार राहत असल्याचे मतदार यादीतून दिसून आले. या घटनेची सत्यता तपासण्या करीता काँग्रेस पदाधिकारी त्या घरात गेले असता ते घर बंद अवस्थेत असून त्या ठिकाणी कुणीच राहत नसल्याचे उघड झाले शहरातील संपूर्ण मतदार यादीत भोंगळ कारभार आहेत. शून्य क्रमाकांचे अनेक घर शहरात असून १०० क्रमांकाच्या ही अनेक मतदार राहत असल्याचा प्रकार उघडकीस आलेला आहे.

चंद्रपूर विधानसभेतील पिपरी हे अतंत छोटेसे गाव असून या गावातील मतदार यादीत जवळपास १०० मतदार हे एकाच घरात राहत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलेला आहे. घुग्घूस शहरात सध्या देशातील अनेक राज्यातील लोक वास्तव्यास आलेले आहेत. जर मतदार यादीत नागरिकांचा पता एकाच घराचा दाखविला जात असेल तर मतदारांची ओळख कशी पटवायची मतदार यादी निर्माण करने त्यांची तपासणी करने व ती जाहीर करने हे निवडणूक आयोगाचे प्रमुख कार्य असतांना इतका मोठा भोंगळ कारभार कसा होऊ शकतो हा मुद्दाम केलेला प्रकार असून चंद्रपूर विधानसभेत ही मोठ्या प्रमाणात वोट चोरी झाली असून महाराष्ट्रातील सरकार हे वोट चोरीचा सरकार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकी पूर्व मतदान याद्याची तातडीने दुरुस्ती करून स्वच्छ व पारदर्शक मतदार यादी प्रकाशित करावी व याप्रमाणे बोगस मतदार याद्या निर्माण करणाऱ्या कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी काँग्रेस तर्फे करण्यात आली असून लवकरच काँग्रेस तर्फे निवडणूक आयोगाच्या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा काँग्रेस अध्यक्ष राजुरेड्डी यांनी दिला आहे.

याप्रसंगी कामगार नेते अनवर सैय्यद,जिल्हा महासचिव अलीम शेख,सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रोशन दंतलवार, तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास गुडला, इंटक जिल्हाउपाध्यक्ष शहजाद शेख,कुमार रुद्रारप,सचिन नागपुरे,सुनील पाटील, शहंशा शेख,अंकुश सपाटे, रंजीत राखुंडे, निखिल पुनगंटी, कपिल गोगला,मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

# नेरी जांभुळघाट रस्त्यावरील ट्रॅक्टर व दुचाकी अपघातातील फरार, ट्रॅक्टर चालक पोलीसांच्या जाळ्यात

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ११ ऑगस्ट :** चिमुर तालुक्यातील नेरी जांभुळघाट मार्गावर दि ९ ऑगष्ट २५ ला सायंकाळी ५.३० वाजताचे दरम्यान ट्रॅक्टर आणि दुचाकीच्या धडकेत दुचाकी स्वार जागीच ठार झाल्याची घटना घडली. घटनास्थळावरून ट्रॅक्टर चालक ट्रक्टर घेवून पसार झाला त्याचा शोध चिमुर पोलीसांनी तपास चक्रे वेगाने फिरवून एपीआय चौधरी यांनी ट्रॅक्टर चालकाला रामपुर येथुन ताब्यात घेतले आहे. चौधरी नामक ट्रक्टर ड्रायव्हर ला अटक केली आहे सदरील ट्रक्टर मालक दडमल यांचे मालकीचे असुन ट्रक्टर जप्त करण्यात आला.

रक्षाबंधन असल्याने अविनाश खेडेकर वय ३२ वर्षे रा मोहाडी चक ता.नागभीड हा आपल्या भावसुन, आणि साळा यांना घेण्यासाठी नेरी जवळील कळमगाव येथे येत असतानी जांभुळघाट मार्गे नेरी पासुन एक किमी अंतरावर केजव्हीलच्या ट्रॅक्टरने जोरदार धडक दिल्याने सिआरपिएफ जवान जागेवरच गतप्राण झाला. फरार चालकाचा शोध घेण्यासाठी चिमुर पोलिस दोन दिवसांपासून शोधात होते अखेर आज दि ११ ऑगष्ट रोजी चिमुर तालुक्यातील नेरी जवळील रामपुर येथुन चालक चौधरी याला अटक केली आहे तसेच ट्रॅक्टर मालकावरही कडक कार्यवाही करण्यात येणार आहे या घटनेचा पुढील तपास एपिआय अजय चौधरी करीत असुन पोलिस विभाग मृतक अविनाश खेडेकर सिआरपिएफ जवान यांच्या कुटुंबियांना न्याय मिळेल अशी आशा बळावली आहे.

**मूल, दि. ११ ऑगस्ट :** १० ऑगस्ट रोजी ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या मूल तहसील कार्यकारिणीच्या स्थापनेचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून ग्राहक पंचायतीचे चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष परशुराम तुंडलवार , संघटक देवीदास नंदनवार उपस्थित होते

# राजुऱ्यातील सोनिया नगर येथील घनकचरा प्रकल्प स्थानांतरित करा

### अन्यथा आंदोलन छेडणार मनसे महिला शहराध्यक्ष भावना लाडसे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ११ ऑगस्ट :** राजुरा शहरात कचरा साठविण्याकरिता नगर पालिकेचा घनकचरा प्रकल्प सोनिया नगर वॉर्ड मध्ये आहे.राजुरा शहरातील संपूर्ण वॉर्डातील कचरा हा सोनिया नगर येथील घनकचरा प्रकल्पात साठविला जातो. घनकचरा प्रकल्पात कचरा साठवणूक करून त्याची योग्य अशी विल्हेवाट लावल्या जात नसल्यामुळे या घनकचरा प्रकल्पातील कचरा सडून त्याची पूर्ण घाण वास प्रकल्पाला लागलेल्या सोनिया नगर वस्तीत पसरत असून त्याचे नागरिकांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे.सोनिया नगर येथील घनकचरा प्रकल्पाविरोधात अनेक नागरिकांनी आवाज उठवला परंतु त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई किंवा नियोजन केल्या गेले नाही.करिता सोनिया नगर वस्तीमधील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये या करिता हा घनकचरा प्रकल्प राजुरा शहराबाहेर स्थानांतरित करण्यात यावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेतर्फे उग्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेच्या शहराध्यक्ष भावना लाडसे यांनी निवेदनातून दिला आहे. या आंदोलनामुळे शहरातील शांतता व सुव्यवस्था बिघडल्यास प्रशासनाची जबाबदारी राहिल असे म्हटले आहे.

# वाघाच्या हल्ल्यात कुडेसावली येथील इसम ठार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ११ ऑगस्ट :** तालुक्यातील कुडेसावली येथील शेतकऱ्यावर वाघाने हल्ला केल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

घनश्याम गोविंदा उंदिरवाडे वय ५२ वर्ष असे मृतकाचे नाव आहे. आज दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोज सोमवारला सकाळी ८ वाजताच्या सुमारास घनशाम शेतावर गेले असता परत येताना झुडपात दगा धरून बसलेल्या वाघाने अचानक हल्ला केल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.त्यांच मुंडक धडापासून वेगळा केला आहे डाव्या पायाच्या पोडरीचा मांस वाघाने खाल्ला आहे,त्यांच्या पश्चात एक मुलगा,नुकताच याच वर्षी लग्न झालेली एक मुलगी व पत्नी,भाऊबंद असा आप्त परिवार आहे. हि माहिती कुडेसावली गावात पसरताच सर्वत्र हळहळ व्यक्त करत आहेत कारण घरातील कमवता व्यक्तीच्या जाण्यामुळे दुःखाचा डोंगर उंदिरवाडे कुटुंबियांच्यावर कोसळला आहे.

# मंडल आयोगाने बहुजनांच्या विकासाचा मार्ग मोकळा

### पत्रपरीषदेत राकां शप गट ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष राजपूरकरची माहिती

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ ऑगस्ट :** सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मुद्द्यांवर जनजागृती करण्याच्या उद्देशाने मंडल यात्रा सुरू करण्यात आली आहे आणि ही यात्रा महाराष्ट्राच्या विविध भागात फिरत आहे. या यात्रेचा मुख्य उद्देश इतर मागासवर्गीय (ओबीसी) समुदायामध्ये जागरूकता पसरवणे आणि त्यांच्या समस्या मांडणे आहे. काही राजकीय पक्षांनी त्याला विरोध केला आणि 'कमंडल यात्रा' काढली. या पक्षांनी त्यावेळी व्ही.पी. सिंह यांचे सरकार पाडले




होते. आज तेच लोक सत्तेत आहेत. जनतेला हे सत्य कळले पाहिजे म्हणून मंडळ यात्रा काढणे आवश्यक आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार गटाचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राज राजपूरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसने 'मंडल यात्रा' सुरुवात नागपूरपासून झाली. पक्षप्रमुख शरद पवार यांनी या यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. मंडल यात्रा ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता चंद्रपूरला पोहोचली. प्रदेशाध्यक्ष राज राजपूरकर म्हणाले की, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मुद्द्यांवर जनजागृती करण्याच्या उद्देशाने ही यात्रा सुरू करण्यात आली आहे आणि ती महाराष्ट्राच्या विविध भागात पोहोचेल. ही यात्रा आणखी ४२ दिवस सुरू राहील अशी माहिती त्यांनी दिली. पत्रकार परिषदेत राज राजपूरकर यांच्यासह जिल्हाध्यक्ष राजेंद्र वैद्य, शहर जिल्हाध्यक्ष बेबी उईके, हिराचंद बोरकुटे आदि उपस्थित होते.

# चिमूर क्रांती जिल्हा निर्मितीसाठी शासनाला समितीच्या वतीने निवेदन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ११ ऑगस्ट :** चिमूर क्रांती जिल्हा निर्मितीची अनेक वर्षा पासून ची मागणी प्रलंबीत असून शासन स्तरावर सातत्याने निवेदने देत असून चिमूर क्रांती जिल्हा संघर्ष समितीचे वतीने ५ जानेवारी व ९ ऑगस्ट ला निवेदन देत असतात. आज दिनांक ११ऑगस्ट ला चिमूर क्रांती जिल्हा कृती समिती च्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना अपर जिल्हाधिकारी थीटे मार्फत निवेदन देण्यात आले.


भारतीय स्वातंत्रलढ्यात चिमूरकरानी प्राणाची आहुती देत मोलाची भूमिका बजावली होती. त्यात बालाजी रायपूरकर हा युवक स्वातंत्र्यासाठी शहीद झाला. त्यामुळे क्रांती भूमी आहे.ताडोबा येथे



आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्याघ्र प्रकल्प आहे.कोळसा खाण, वनस्पती ने नटलेला परिसर आहे. रामदेगी, मुक्ताई,सात बहिणी डोंगर असे पर्यटन स्थळ आहे.तसेच चिमूर हे चंद्रपूर, नागपूर,भंडारा, वर्धा, गडचिरोली जवळ पास १०० किमी दरम्यान आहे.

चिमूर क्रांती निर्माण करण्यासाठी स्वातंत्रसंग्राम सैनिक स्व. काळे गुरुजी यांनी ४५वर्षापूर्वी पासून चळवळ उभी केली होती आणि आजही चिमूर क्रांती जिल्हा कृती समिती च्या माध्यमातून लढा सुरु आहे. अपर जिल्हाधिकारी थीटे व उपविभागीय अधिकारी घाडगे यांना निवेदन देत असतांना केशवराव वरखेडे, प्रा संजय पिठाडे, डॉ दिलीप शिवरकर, सुभाष शेषकर, रमेश खेरे, प्रा. महादेव पिसे, डॉ महेश खानेकर,ॲड. महेशदत्त काळे, ॲड. सोनू श्रीरामे ॲड. सुभाष नन्नावरे, ॲड. शैनेशचंद्र श्रीरामे, ॲड. संदीप हिंगे, ॲड. नितीन रामटेके, ॲड. मुरकुटे, रवी मासुरकर, धर्मदास गेडाम, मोतीराम कुळमेथे, पठाण सर, कैलास रायपुरे सह आदी उपस्थित होते.

# क्रांती जिल्ह्याकरिता बसपाचा जाहीर पाठिंबा



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ११ ऑगस्ट :** चिमूर क्रांती जिल्हा निर्मीतीची मागणी पाच दशकांपासुन असुन अनेक निवेदने, आंदोलन करून सुद्धा चिमूर कांती जिल्हा शासनाने निर्माण केलेला नाही तेव्हा केशव वरखेडे यांचे नेतृत्वात शहीद स्मृती दिन १६ ऑगस्ट २०२५ ला उपोषण करण्यात येणार आहे. त्यांच्या उपोषणाला बहुजन समाज पार्टी चिमूर तालुका जाहीर पांठीबा देत असल्याचे निवेदन विभागीय अधिकारी चिमूर यांना धर्मदास गेडाम, सुधाकर रामटेके यांनी दिलेले आहे.

चिमूर क्रांती जिल्हा निर्माण करावा या मागणी करिता बसपा पुर्ण ताकतीने आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहीती बसपा चिमूर विधानसभा पभारी धर्मदास गेडाम यांनी दिली.

# माझ्या विजयात लाडक्या बहिणींचा अमूल्य वाटा : आ. सुधीर मुनगंटीवार

### भाजपा बल्लारपूर तालुकाद्वारा रक्षाबंधन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ ऑगस्ट :** लाडक्या बहिणींचे प्रेम, विश्वास आणि आशीर्वादामुळेच मी आज जनसेवेसाठी सक्षमपणे उभा आहे. माझ्या विजयात लाडक्या बहिणींचा अमूल्य वाटा आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

बल्लारपूर नाट्यगृहात, भाजपा बल्लारपूर तालुकाद्वारा आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाला वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भाजपा शहर अध्यक्ष रणजयसिंग, महिला आघाडी अध्यक्ष वैशालीताई जोशी, आरती अक्केवार, कांताबाई ढोके, शिवचंद्र द्विवेदी, जयश्रीताई मोहूर्ले, संध्याताई मिश्रा, रेणुकाताई दुधे, सारिका कणकम, किशोर मोहूर्ले, सतीश कणकम, गुलशन खान, देवेंद्र वाटकर, नजमा खान, उत्तरा सोनटक्के, उन्नती टेकाडे, सुनीता निवलकर, सुरेखा श्रीवास्तव आदींची उपस्थिती होती.




आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, रक्षाबंधनाचा हा पवित्र उत्सव आहे. लाडक्या बहिणींच्या मनातील प्रत्येक इच्छा व आकांक्षा पूर्ण व्हाव्यात. राखीचा हा धागा हा केवळ प्रेम आणि विश्वासाचे प्रतीक नाही, तर रक्ताच्या नात्यापेक्षा अधिक दृढ असा अतूट बंध आहे. हा दिवस माझ्यासाठी अत्यंत सौभाग्यशाली असून शेकडो लाडक्या बहिणींनी राखी बांधून मला आपुलकीचा मान दिला.

या राखीने माझ्यावर लाडक्या बहिणींचा विश्वास, प्रेम, सुरक्षितता आणि काळजी घेण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली आहे. लाडक्या बहिणींच्या कल्याणासाठी स्व. सुषमा स्वराज कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात आली असून, या केंद्रातून प्रशिक्षण घेतलेल्या महिला आत्मनिर्भर होत आकाशात उंच भरारी घेतील. असा विश्वास देखील आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार मुनगंटीवार यांनी लाडक्या बहिणींबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या कल्याणासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा संकल्प केला.

# महाराष्ट्र शासन गरीब जनते विरोधी असल्यामुळेच ग्रामीण रुग्णालय सुरू होत नाही : राजुरेड्डी

### ग्रामीण रुग्णालया करीता काँग्रेसचे आत्मक्लेश आंदोलन संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ११ ऑगस्ट :** एकावर्षापूर्वी शहरात निर्माण झालेली ग्रामीण रुग्णालयाची इमारत ही शोभेची वस्तू झालेली आहेत. तीस खाटाचे ग्रामीण रुग्णालय तातडीने सुरू करा यामागणी करीता काँग्रेस अध्यक्ष राजुरेड्डी यांच्या नेतृत्वा खाली छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारी १ वाजता आत्मक्लेश आंदोलनाला सुरुवात करण्यात आली.

रुग्णालयाच्या इमारती समोर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमे समोर ग्रामीण रुग्णालय सुरू करावा याकरिता सदबुद्धी यावी म्हणून टाळ वाजवीत विनंती करण्यात आली व यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराष्ट्र शासनाचा निषेध व्यक्त



करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र शासन मुर्दाबादचे घोषणा देण्यात आल्या.

यावेळी काँग्रेस अध्यक्ष राजुरेड्डी यांनी भाजपा शासनावर जोरदार हल्ला चढवीत गरीब विरोधी असल्याचा ठपका ठेवीत नागरिकांना हेतूपूर्वक आरोग्य सेवा देत नसल्याचा ठपका ठेवला केंद्र शासनाच्या आयुष्यमान योजना ही फसवी असून देशातील ६०० रुग्णालयाने या योजने अंतर्गत उपचार करण्यास नकार दिलेला आहेत.

कोरोना काळानंतर सर्वात जास्त लक्ष हे आरोग्य यंत्रणावर देणे गरजे असतांना भाजपाने फक्त आमदार खरेदी करण्यावरच लक्ष दिल्याचे आरोप ही रेड्डी यांनी केले आहेत. यावेळी यास्मिन सैय्यद, दिप्ती सोनटक्के व श्वेता आवळे या महिला व तरुणीने ही शासनाला चांगलेच धारेवर धरले. ग्रामीण रुग्णालयाचे महिलांना असलेली गरज व महिलांना होणारा त्रास ही त्यांनी व्यक्त केला.

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रमुख औद्योगिक शहर असून शहरात सध्या प्राथमिक आरोग्य केंद्रच सुरू आहेत. महिलांना गरोदरपणात प्रसूतीच्या प्रसंगी सिजर ऑपरेशन करीता जीवघेण्या कळा सोसत चंद्रपूर येथे जावे लागत असून साधा एक्सरा ही प्राथमिक आरोग्य केंद्रात होत नाही याकरिता काँग्रेसतर्फे आंदोलन छेडण्यात आले.

सदर आंदोलनात काँग्रेस नेते सैय्यद अनवर, ज्येष्ठ नेते शामराव बोबडे, जिल्हा महासचिव अलीम शेख, जिल्हा उपाध्यक्ष यास्मिन सैय्यद, जिल्हा महासचिव पद्मा त्रिवेणी, जिल्हा सचिव दुर्गा पाटील, शहर कार्याध्यक्ष दिप्ती सोनटक्के, निशा शेख,मंगला बुरांडे, शिल्पा गोहील, प्रीती तामगाडगे, पूनम कांबळे,ज्येष्ठ नेते अनिरुद्ध आवळे,जिल्हा सचिव अजय उपाध्ये,शेख शमिउद्दीन, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रोशन दंतलवार, तालुका सचिव विशाल मादर, तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास गुडला, इंटक उपाध्यक्ष शहजाद शेख, एन. एस. यु. आय अध्यक्ष आकाश चिलका, मोसीम शेख, देव भंडारी,अरविंद चहांदे,सैदू भाई,रोहित डाकूर, सुनील पाटील,भास्कर सोनेकर उपस्थित होते.

## गणेशोत्सवासाठी एक खिडकी योजना

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ ऑगस्ट :** चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे गणेशोत्सवा प्रसंगी सार्वजनीक गणेश मंडळांना लागणाऱ्या विविध परवानग्या या एकाच ठिकाणाहुन मिळाव्या यासाठी एक खिडकी प्रणाली सुरु करण्यात आली असुन मनपा मुख्य इमारत येथे गणेश मंडळांसाठी मदतकक्षसुद्धा सुरु करण्यात आला आहे. येत्या २७ ऑगस्टपासुन शहरात दहा दिवस गणेशोत्सव साजरा होणार आहे. गणेश मंडळांना महापालिका व इतर विभागाकडून रीतसर परवानग्या या घ्याव्या लागतात. पोलीस स्टेशन, ट्राफिक पोलीस स्टेशन,सार्वजनिक बांधकाम, अग्निशमन, महावितरण केंद्र, महानगरपालिका इत्यादी विभागाच्या परवानगी या एकच ठिकाणाहुन घेता येणार आहे.

## कार्यालय नगर परिषद वरोरा
## जाहीर सूचना

वरोरा शहरातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, नगर परिषद वरोरा क्षेत्रातील सर्वे क्र.३११ येथील १.४१ हे. आर जमीन पैकी ०.५६ हे. आर जमीन वरील झाडे तोडण्यास परवानगी मिळण्याबाबत मे. मेहाडीया इन्फ्रास्ट्रक्टर, चंद्रपूर यांनी अर्ज या कार्यालयास सादर केला असून महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधिल कलम ०८ (०२) व (०३) अन्वये असे नगर परिषद क्षेत्रातील झाडाच्या फांद्या कटाई करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देण्याबाबत आपणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास दि. १८/०८/२०२५ दुपारी ०३ वाजेपर्यंत लेखी सादर करावे, विहीत मुदतीनंतर प्राप्त होणा-या आक्षेप/हरकत विचारात घेतली जाणार नाही.

| अ. क्रं. | अर्जदाराचे नांव | वार्डचे नांव | स्थळ | झाडाच्या जातीचा प्रकार | झाडाच्या फांद्या कटाई करण्याचे कारण / झाड कटाई करण्यास परवानगी देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे. मेहाडीया इन्फ्रास्ट्रक्टर, चंद्रपूर | टिळक वार्ड | रेस्ट हाऊस जवळ | कडूलिंब झाड ४ नग, गुलमोहर झाड ८ नग व इतर काटेरी झाडे | नगरपरिषदचे टाऊन हॉल व गाळे बांधकाम करणे |

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद वरोरा

राहुल गांधींनी एक 'व्यावसायिक डेटा विश्लेषण' सादर केले अन संपूर्ण देश एका नव्या चर्चेत गुरफटला. राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला प्रश्न विचारले आणि उत्तर ज्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देऊ लागले, त्याचवेळी 'दाल मे कुछ काला है' याची जाणीव देशाला होऊ लागली. आपण निवडणूक आयोगाचे मुख्य प्रवक्ते नसून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आहोत, याचा विसर त्यांना पडला असावा. देशातील विरोधी पक्षनेत्याने निवडणूक आयोगाची बोगस मतदार प्रणाली उघड केली अन देश हादरला ही वस्तुस्थिती आहे. परिपूर्ण आणि ठोस कॉर्पोरेट सादरीकरण झाल्याने देश पण अवाक झाला. राहुल गांधींनी मतदाराच्या प्रत्येक कायदेशीर पैलूचा पुरावा म्हणून तपास केला आहे. त्यात फोटो, नाव, पत्ता, वडिलांचे कींवा पतीचे नाव, मतदार कार्डचे नाव आणि इतर डेटा पॉइंट्स सखोल अभ्यासले. सध्या कोणत्याही लोकशाहीमध्ये, प्रेस, एजन्सी आणि लोकशाही मंचांनी प्रत्येक घरात जाऊन राहुल गांधींनी नमूद केलेल्या डेटा पॉइंट्सचा वापर करून वास्तव तपासायला हवे होते. पण चौकशीऐवजी राहुल गांधींनाच प्रतिज्ञापत्र देण्यास सांगण्यात आले. आज तरी राहुल गांधींवर शिव्यांचा वर्षाव होत आहे. त्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसही मागे राहिले नाही. लोकशाहीच्या मारेक ?्यांकडे सध्या तरी कोणतेही शस्त्र शिल्लक राहीलेले दिसत नाही. राहुल गांधींकडून प्रतिज्ञापत्र मागून कोणीही निवडणूक आयोगाला प्रश्न विचारू शकत नाही हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे प्रश्न पडतो की, निवडणूक आयोग लोकशाही व्यवस्थेपेक्षा वर आहे का? जर निवडणूक आयोगाकडे थोडेशीही सत्य, लाज, लज्जा, शरम, विनय आणि लोकशाहीचा आदर शिल्लक राहिला असता, तर राहुल गांधींच्या पत्रकार परिषदेनंतर लगेचच ते राहुल गांधींनी दिलेल्या भाषणापर्यंत माध्यमांसह पोहोचले असते. एका बेडरूममध्ये ८० लोक राहतात? तीन तीन राज्यांमध्ये एकच मतदार मतदान करत आहे. एका महिलेकडे एकाच नावाचे तीन मतदार कार्ड आहेत आणि तरीही राहुल गांधींकडून प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे का? पण यावेळी राहुल गांधी कोणालाही माफ करण्याच्या मनस्थितीत नाहीत. या गुन्ह्यात सहभागी असलेला निवडणूक आयोगाचा प्रत्येक गुन्हेगार घाबरला आहे, असे चित्र दिसत आहे. त्या गुन्हेगारांना हे समजले असावे की, देशद्रोहाचा परिणाम खूप वाईट आहे. असं म्हणतात की राहुल गांधींकडे या पेक्षा अधिक डेटा आहे. अजून बरेच खुलासे व्हायचे आहेत. यामुळे संपूर्ण जगात खळबळ पसरली आहे व राहुल गांधींबद्दल जगभरात चर्चा होत आहे. लोकशाही आणि अर्थव्यवस्था यांच्यात खोलवर संबंध आहे. जर आपली लोकशाही अपयशी ठरली तर भारताची अर्थव्यवस्थाही टिकणार नाही असे अनेकजण बोलून दाखवत आहे. लोकशाहीच्या नावाखाली एकाधिकारशाही राबवली जाणे म्हणजे निकोप लोकशाही नाही. देशातील सरकारबद्दल आता जे बोललं जातयं ते योग्य नाही. 'लश्कर भी तुम्हारा है, सरदार तुम्हारा है, तुम झुठ को सच लिख दो अखबार तुम्हारा है, इस दौर के फरियादी जायें तो कहा जायें, क्यूं की कानून तुम्हारा है और दरबार भी तुम्हारा है'!





# निवडणूक आयोगाला झालंय तरी काय?


थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

भारतीय उपखंडातील कुठल्याही देशात निकोप लोकशाही रुजणे आणि टिकवणे यासाठी सगळ्यात महत्वाची आणि अनिवार्य पूर्वअट म्हणजे त्या देशाने धर्मनिरपेक्ष असणे. लोकांचे अधिकार आणि स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने अबाधित असणे, सरकार, नोकरशाही लोकांना उत्तरदायी असणे, सरकारच्या धोरणांवर लोकांनी टीका करणे, धोरणांची चिरफाड करणे, सनदशीर मार्गाने विरोध नोंदवणे आणि निष्पक्ष निवडणुकांच्या माध्यमातून सत्तांतर घडणे या गोष्टी निकोप लोकशाहीमध्ये प्राथमिक आहेत.

भारतीय उपखंडात असणारी भाषिक, भौगोलिक, सांस्कृतिक विविधता असणारा कुठलाही प्रदेश जगाच्या पाठीवर नाही, तिथे सगळ्यांना सोबत घेऊन चालण्यासाठी लोकशाही आणि म्हणून धर्मनिरपेक्ष असणे याला पर्याय नाही. कारण इथ देशाचा विशिष्ट धर्म असून उपयोग नाही. लोकशाहीच्या माध्यमातून एकाधिकारशाही कशी राबवली जाते याच उदाहरण आपल्या शेजारी बांगलादेश आणि पाकिस्तानात समोर आहे. त्यामुळे धर्मनिरपेक्षता आणि सर्वधर्मसमभाव या तत्वांच्या विरोधात बोलणारा माणूस प्रत्यक्षात लोकशाहीच्या विरोधात बोलतो आहे आणि असा माणूस लोकशाहीचा शत्रू आहे असं खुशाल समजून चला.

राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी तत्परतेने निवडणूक आयोगाची बाजू घेऊन प्रतिक्रिया देण्याची केविलवाणी धडपड विरोधीपक्ष नेत्यांची निरीक्षणे योग्य असल्याची सिध्द होते. जेव्हा जेव्हा विरोधीपक्ष नेता निवडणूक आयोगाच्या गलथान कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात; तेव्हा तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षातील मंत्री विद्युतवेगाने आयोगाची बाजू तावातावाने मांडताना दिसून येतात. यामागे नक्की काय काळबेरं आहे याचा विचार मतदारांनी करायला हवा. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी निवडणूक आयोगाच्या प्रवक्त्याप्रमाणे आयोगाचा बचाव करत विरोधीपक्ष नेत्यावर वैयक्तिक टीका केली, ज्यामुळे त्यांची उद्विग्नता स्पष्ट दिसते.

राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे हे वर्तन त्यांच्या राजकीय हतबलतेचे द्योतक दिसते. निवडणूक आयोगानेही विरोधीपक्ष नेत्याच्या आरोपांना बेजबाबदार ठरवत चर्चेचे आमंत्रण दिले, पण विरोधीपक्ष नेत्याने सादर केलेल्या ठोस पुराव्यांचे खंडन करण्यात आयोग सपशेल अपयशी ठरलाय. विरोधीपक्ष नेत्याच्या या विश्लेषणाने व पुराव्यांनी निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर आणि सत्ताधाऱ्यांच्या विजयाच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. विरोधीपक्ष नेत्याने पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्र, हरियाणा व कर्नाटक राज्यातील निवडणूकांमध्ये बोगस मतदानाच्या आधारे आता सत्तेवर असलेल्या पक्षाला निवडणूक जिंकता येते याची कार्यपद्धती दाखवून दिली आहे.

विरोधी पक्षनेत्याने सादर केलेल्या पुराव्यांनुसार, मतदार यादीद्वारे पाच प्रकारच्या मतांच्या चोरीची पोलखोल केली आहे. त्यानुसार बोगस दुबार मतदार, खोटे आणि अवैध पत्ते असलेले मतदार, एकाच पत्त्यावर अनेक मतदार, अवैध किंवा फोटो नसलेले मतदार, फॉर्म क्रमांक ६ चा गैरवापर करुन नोंदणी केलेले नवीन मतदार यांची पोलखोल निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादीचे विश्लेषण करुन केली आहे. कर्नाटकातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघाचे अशाप्रकारे विश्लेषण केल्यानंतर एकूण १,००,२५० मतदारांचा बोगसपणा उघड झाला.

निवडणूक आयोगाने राहुल गांधींना कर्नाटकातील त्या बनावट मतांच्या आरोपांवर शपथपत्र सादर करण्यास किंवा माफी मागण्यास सांगितले. राहुल गांधींनी हा आरोप बंगलोर सेंट्रल मतदारसंघातील महादेवपूरा विधानसभा क्षेत्राबाबत केला होता. आयोगाने स्पष्ट केले की, आरोप खरे असतील तर पुरावे द्यावेत, अन्यथा माफी मागावी. राहुल गांधींनी प्रत्युत्तरात निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करत इलेक्ट्रॉनिक मतदार यादीची मागणी केली.

महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदार यादी पारदर्शकपणे तयार केल्याचे आणि काँग्रेसला ती वेळेत दिल्याचे सांगितले. निवडणूक आयोगाने काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना कर्नाटक आणि महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या निवेदनावर सही करण्यास किंवा त्यांच्या निराधार आरोपांसाठी देशाची माफी मागण्यास सांगितले आहे.

कर्नाटक आणि महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांना पत्र लिहून शपथपत्र सादर करण्यास आणि विशिष्ट पुरावे देण्यास सांगितले आहे. निवडणूक आयोगाने राहूल गांधींकडे शपथपत्र मागितले आहे, पण त्यांनी संसदेत संविधानावर हात ठेवून शपथ घेतली आहे.

ते म्हणाले, जेव्हा जनता आमच्या डेट्याबाबत प्रश्न विचारते, तेव्हा निवडणूक आयोगाने राजस्थान आणि बिहारमधील वेबसाइट बंद केली आहे. कारण त्यांना माहिती आहे की, जनतेने डेट्यावर प्रश्न विचारायला सुरुवात केली तर त्यांची पोल उघड होईल.

राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला इलेक्ट्रॉनिक मतदार यादी देण्याची मागणी केली आहे. ते म्हणाले, मी काल सिद्ध केले आहे की देशात मतांची चोरी झाली आहे. जर निवडणूक आयोगाने आम्हाला इलेक्ट्रॉनिक मतदार यादी दिली, तर आम्ही सिद्ध करू की पंतप्रधान मत चोरी करून पंतप्रधान झाले. राहुल गांधी यांच्या आरोपांमुळे निवडणूक आयोग आणि काँग्रेसमधील तणाव वाढला आहे.

आयोगाने गांधी यांना पुरावे सादर करण्याचे आव्हान दिले आहे, तर गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. हा वाद पुढे काय वळण घेईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

संसदेत भाषण करताना चारच दिवसापूर्वी मोदी राहुलकडे पाहात चेष्टायुक्त स्वरात म्हणाले होते की, या लोकांना जनता वारंवार का नाकारतेय ते त्यांना अजून का लक्षात येत नाही? तर त्याच्या आदल्या दिवशी नासक्या सुरात राहुल गांधींना उद्देशून म्हणत होते की, २०२९ साली देखील तुम्ही त्याच म्हणजे विरोधी बाकावर बसणार आहात. सत्तेतून आलेला हा उद्दामपणा कशाच्या जोरावर होता, तर चालविलेल्या अखंड मत चोरीच्या जोरावर ना? त्याची पोलखोल राहूल गांधींनी नुकतीच जगासमोर केलीय.

भक्कम संघटन, कुणाची तरी चाणक्यगिरी, मोदींची लोकप्रियता, आरएसएसचा सक्रिय पाठिंबा, कार्यकर्त्यांची मेहनत, लोकांची केलेली कामे म्हणजे विकास, जगात वाढलेली प्रतिष्ठा या सगळ्यातील फोलपणा नुकताच नागडा झांला. भाजपला गेली अकरा वर्ष मिळालेला पाठिंबा हा लोकप्रेमातून मिळत नव्हता, तर तो मतांच्या चोरीतून मिळवला जात होता, हे राहूल गांधींनी उघडं केलंय.

या मतचोरीची तयारी भाजपने फार अगोदरपासून चालवली होती. त्यासाठी त्यांना 'असोशिएशन ऑफ बिलियन माईंड्स' ही कंपनी मदत करत होती. गुगलवर तिची कुंडली लोकांनी शोधली. भाजपसाठी फर्जी मतदार तयार करणाऱ्या या कपंनीची दिल्ली, गुजरात आणि हैद्राबाद येथे कार्यालये आहेत. कंपनीने तयार केलेल्या बोगस मतदार यादीवर निवडणूक आयोगाचे अधिकारी मान्यतेची मोहोर तात्काळ उमटवीत असायचे. हेच भाजपच्या यशाचे गमक समजता येईल.

ममता बॅनर्जींनी ती चोरी पकडण्याचा प्रयत्न केला, तेव्हा कंपनी सावध झाली, पण भाजपसाठी काम करत राहिली. गेली अकरा वर्ष या कंपनीने भारतीय निवडणूक ही चेष्टेचा विषय बनविलाय, ही गंभीर बाब आहे. या मतचोरीच्या घटनेत नैतिकता आणि देशप्रेमाचे डोस लोकांना वारंवार पाजणाऱ्या पाखण्डी देशभक्तांचेही पूर्ण वस्त्रहरण झालंय. सामान्य जनता आपल्याला जवळ करत नाही, हे लक्षात आल्यावर येन केन प्रकारे सत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याचा हा प्रकार दिसतो. त्यासाठी त्यांना आपली माणसे सर्व मोक्याच्या जागी हवीत. शिवाय सत्ता देखील सुशेगात राहायला हवी.

मग देशभर हिंदू -मुसलमान, मशीद-मंदिराचा हमखास ध्रुवीकरण करणारा अजेंडा त्यांनी इमाने इतबारे चालवला आणि त्या आवरणाखाली मतांची चोरीदेखील लपवली जात होती. राहुल गांधींनी जणू बॉम्ब फोडलाय आणि एका अर्थी संविधानाचा गळा मोकळा केलाय.

दिल्ली निवडणुकीपूर्वी हाच मतदारयादीचा घोटाळा आम आदमी पार्टीने पुराव्यानिशी उघडा पाडला होता. पण त्यावेळी राहूल गांधी शांत होते. तेव्हाही काही झाले नाही, आत्ताही काही होणार नाही असा सर्वांचा समज होता. करंटेपणा व बालिशपणा सोडून आणि दम असेल तर राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर दिले पाहिजे.

## भारत खरोखरचं बांगलादेशच्या मार्गावर चालला?

संसदेत मोदी व भाजप सरकारने सांगितलेलं आहे, निवडणूक आयोगाला विचारलेल्या प्रश्नांना, आक्षेपांना उत्तर देणे सरकारचे काम नाही. सबब आम्ही उत्तर देणार नाही. पण निवडणूक आयोगाची अवस्थाच पुराणातल्या शकुंतलेसारखी झालेली आहे. राहुल गांधींच्या एका पत्रकार परिषदेत केलेल्या खुलाशानंतर मतदार यादीतील झोल झाल्याचं ऐकून लोकांची उत्सुकता ही शिगेला पोहचली होती. यांचाच परिपाक पाहून निवडणूक आयोगाने बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादी राज्यांच्या याद्या आता वेबसाइटवरून काढून टाकल्या आहेत. भारत आता बांगलादेशच्या मार्गावर चालत असल्याचे दिसून येत आहे. जिथे शेख हसीना निवडणूक जिंकत होत्या, पण लोकांचा विश्वास संपूर्ण गमावला. भारतात, निवडणूक आयोग आणि सरकारवरील लोकांचा विश्वास कमी होऊ लागला आहे. चोरी पकडून दिल्यावर आधी शपथपत्र द्या असं आयोगानं म्हणणं हा अति उच्च दर्जाचा बेशरमपणा आहे. आयोगाचे आयुक्त आणि अधिकारी लोकांच्या करातून पगार घेतात, मोदी शहांच्या खाजगी जायदादीतून नाही. आयोग आम्हाला म्हणजे सामान्य माणसांना म्हणजेच 'लुई दी पिपल्स ऑफ इंडिया'ला उत्तरदायी आहे. कारण तो आमचा म्हणजे भारतीय नागरिकांचा नोकर आहे. नोकरानं दुसऱ्या वरिष्ठ नोकरांच्या जीवावर मूळ मालकाशी उद्धट वागू नये हा नियम आहे. निवडणूक आयोगाची विश्वासार्हता संपली आहे. म्हणून त्यानं उत्तर देण्याआधी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एक मंत्री आशिष शेलार आयोगाची प्रवक्तेगिरी करत आहेत. भाजपाचे नेते का स्पष्टीकरण देत आहेत? लोकांना सगळं कळतंय. लोक स्वतःच उपाययोजना करतील. भारतीय माणूस सहनशील असतो. शंभर अपराध भरल्याशिवाय सुदर्शन चक्र उचलत नाही. उचलतो त्यादिवशी इंदिरा गांधींना राजनारायण नावाचा विदूषकही हरवून टाकतो. तो दिवस येणं अटळ आहे. तोपर्यंत भाजपवाल्यांनी धिंगाणा करून घ्यावा. लोकांनाही बहुमत देण्याची किंमत कळली पाहिजे.

# वादग्रस्त चित्रपटांवर बंदी हवीच!

वाद निर्माण होतील असे चित्रपट बनवायचे म्हणजे त्याविषयी समाजात मोठ्या प्रमाणात चर्चा होते, त्याचा निषेध केला जातो, त्यासाठी आंदोलने उभारली जातात, वृत्तवाहिन्यांवर त्याबाबत चर्चासत्रे भरवली जातात आणि या सर्वांतून चित्रपटाला फुकटची प्रसिद्धी मिळते आणि लोकं चित्रपटात नेमकं आहे तरी काय हे पाहण्यासाठी चित्रपट गृहाच्या बाहेर गर्दी करतात.

अशा प्रकारचे फॅड गेल्या काही वर्षांपासून निर्माण झाले आहे. 'खालिद का शिवाजी' हा सुद्धा त्यापैकीच एक चित्रपट. आज या चित्रपटाला समाजातून मोठ्या प्रमाणात विरोध होताना दिसत आहे. या चित्रपटाद्वारे इतिहासाचे विकृतीकरण केले गेल्याचा आरोप या चित्रपटावर होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाचा सोळाव्या वर्षी रायरेश्वराला स्मरून हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली. पाच यवनी पातशाह्यांना त्यांनी नेस्तनाबूत केले.

या सर्वांत त्यांना साथ लाभली ती देव, देश आणि धमार्साठी प्रसंगी प्राण अर्पण करणाऱ्या स्वराज्यनिष्ठ मावळ्यांची. 'आधी लगीन कोंढाण्याचे मग माझ्या रायबाचे' अशी प्रतिज्ञा घेणारे तानाजी मालुसरे, 'शत्रूस धुळीस मिळवल्याशिवाय राजे तुम्हाला तोंड दाखवणार नाही' असा पन करून हजारो यवनी सैनिकांवर तुटून पडलेले स्वराज्याचे सात शिलेदार, 'राजे तुम्ही गडावर पोहोचल्याशिवाय हा बाजी प्राणही त्यागणार नाही' असे आश्वासन देणारे बाजीप्रभू देशपांडे, यांसारख्या अनेक पराक्रमी मावळ्यांच्या कथा इतिहासाच्या पुस्तकातून वाचून आपण सर्वच जण लहानाचे मोठे झाले आहोत.

शालेय अभ्यासक्रमाच्या कोणत्याही पुस्तकात शिवाजी महाराजांच्या सैन्यात ३५ टक्के मुस्लिम होते आणि महाराजांचे ११ अंगरक्षक मुस्लिम होते असे आजतगायात शिकवण्यात आलेले नाही. मग या चित्रपटासाठी हा शोध कुठून लागला? असा प्रश्न यानिमित्ताने हिंदुत्ववादी संघटनांकडून विचारला जात आहे.

महाराजांनी रायगडावर मशिद उभारल्याचा दाखल कोणत्याही ऐतिहासिक दस्तावेजात नाही मग या चित्रपटात या बाबी घुसवून महाराजांना हेतुपुरस्सर पंथनिरपेक्ष ठरवण्याचा प्रयत्न का केला जात आहे असाही सवाल केला जात आहे. उलट शिवकालीन पत्रांमध्ये महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी परकीय आक्रमकांशी कोणतीही तडजोड केली नाही, याचे स्पष्ट उल्लेख आढळतात. त्यामुळे इतिहासाचे विकृतीकरण करणाऱ्या या चित्रपवर तात्काळ बंदी घालण्याची मागणी हिंदुत्ववाद्यांकडून केली जात आहे.

जर मुस्लिम समाजाला खरेच छत्रपती शिवाजी महाराजांविषयी प्रेम असते, तर पाच मुसलमान पातशाह्यांनी त्यांना संपवण्याचा चंग बांधला नसता किंवा छत्रपती संभाजी महाराजांना हालहाल करून मारले नसते.

सध्याच्या काळातही जर मुसलमान समाजाला शिवाजी महाराजांप्रती आदर असता, तर यवत (ता. दौंड, जि. पुणे) येथे झालेल्या हिंसाचारात सय्यद नावाच्या धर्मांध व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती फोडली नसती. त्यामुळे खालिद का शिवाजी हा चित्रपट हिंदू समाजात भ्रम निर्माण करणारा आणि शिवाजी महाराजांचे खोटे चित्रण करणारा आहे, असा आरोप हिंदू जनजागृती समितीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला असून या चित्रपटाच्या विरोधात जन आंदोलन छेडले आहे.

ज्याप्रमाणे उदयपूर फाइल्स : कन्हैय्यालाल टेलर मर्डर या चित्रपटामुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे त्यावर अंतरिम बंदी आणण्यात आली, त्याचप्रमाणे खालिद का शिवाजी या चित्रपटामुळे दुखावलेल्या शिवप्रेमी जनतेच्या भावनांची दखल घेऊन या चित्रपटावर बंदी घालण्यात यावी अशी मागणी समितीने केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी तत्कालीन सर्वच पंथियांचा आदर केला आहे, याचा अर्थ ते पंथनिरपेक्ष होते असा होत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी मुस्लिम समाजाला एव्हढाच आदर आहे तर वर्षातून दोन वेळा राज्यासह देशभरात साजरे होणारे शिवजयंती महोत्सव किती मुस्लिम मोहल्यांमध्ये साजरे केले जातात? किती मुस्लिमांच्या घरात शिवरायांच्या तसबिरी किंवा मूर्ती आहेत असाही सवाल यानिमित्ताने हिंदुत्ववाद्यांकडून विचारला जात आहे.

त्यामुळे लोकभावनांची वेळीच दखल घेऊन खालिद का शिवाजी या चित्रपटावर सरकारने बंदी आणावी आणि शिवप्रेमीना आश्वस्त करावे अशी मागणी एकमुखाने होत आहे!


जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

## चोरट्यांनी हॉटेलमधून मोर कुठून आणि का चोरले?




अमेरिकेतील उत्तर कॅलिफोर्नियामधील एका जुन्या हॉटेलमधून डझनभर मोर आणि मोर गायब झाले आहेत. एका मोराची किंमत सुमारे १.६ लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. हॉटेल कर्मचाऱ्यांचा असा विश्वास आहे की ते चोरीला गेले आहेत. हॉटेलचे जनरल मॅनेजर डेव्हिड निल्सन म्हणाले की, एका ग्राहकाने दोन लोकांना पिकअप ट्रकच्या पिंजऱ्यात मोर ठेवताना पाहिले. मोजणी केल्यावर असे आढळून आले की आता फक्त चार मोर उरले आहेत. हे मोर १४ वर्षांपूर्वी खरेदी केले होते आणि आता एकूण १५ मोर होते, जे हॉटेलची ओळख बनले होते, ज्यांना कर्मचारी पाळीव प्राणी म्हणून पाळत असत.

पोलिस या प्रकरणाची चौकशी करत आहेत. हॉटेलने पाळत वाढवली आहे आणि कुंपण घालण्याचीही योजना आखत आहे. कर्मचाऱ्यांना आशा आहे की त्यांचे लाडके मोर सापडतील.

## चैतन्याचा स्त्रोत मंदिरे

वाचक लिहितात

भारतीय संस्कृतीत मंदिरांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. पूर्वी मंदिरे चैतन्याचे स्त्रोत तर होतीच शिवाय स्थानिकांच्या चारिताथार्चा भारही मंदिरे उचलत होती. प्रत्येक मंदिराच्या ठिकाणी पूर्वी गोशाळा, गुरुकुल, वेदपाठ शाळा, धर्मशाळा अशी परिपूर्ण विकास रचना होती त्यातून नीती आणि नैतिक मूल्यांचे, आदर्श जीवनशैलीचे आणि धर्माचरणाचे शिक्षण दिले जात असे. पंथनिरपेक्षव्यवस्थेमुळे आज ही स्थिती राहिलेली नाही. मंदिर अधिग्रहण कायदा करून सरकारने देशातील अनेक प्राचिन मंदिरे आपल्या ताब्यात घेऊन त्यावर सरकारी समित्या नेमल्या आहेत.

सश्रद्ध भाविकांकडून देवतांच्या चरणी श्रद्धेने अर्पण केलेल्या धनाचा वापर शासकीय योजनांसाठी आणि अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी हवा तसा वापरला जात आहे. मंदिरावर नेमलेल्या सरकारी अधिकाऱ्यांकडून अनेक ठिकाणी आर्थिक गैरव्यवहार केले गेल्याचीही प्रकरणे उजेडात आली आहेत. हिंदूंनी मंदिरात अर्पण केलेल्या धनाचा वापर खरेतर मंदिराच्या विकासासाठी, धार्मिक विधींसाठी, गोशाळा, गुरुकुल चालवण्यासाठी व्हायला हवा. मात्र असे काही घडताना दिसत नाही. देवधनाकडे सरकारी धन म्हणून पाहिले जात आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे केवळ हिंदूंच्या मंदिरांबाबतचे घडत आहे. आजमितीला देशातील अन्य पंथीयांचे कोणतेही प्रार्थनास्थळ किंवा धार्मिक ठिकाण यांवर सरकारी नियंत्रण नाही. उत्तर भारतातील अनेक मंदिरे आज विकसित करण्यात आली आहेत, त्या ठिकाणी लोकांना पाहण्यासाठी विविध प्रकारची दालने उभारण्यात आली आहेत, भक्तांच्या निवासासाठी आकर्षक इमारती उभारण्यात आल्या आहेत. याठिकाणी हिंदूंना धर्मशिक्षण देण्याची कोणतीच व्यवस्था करण्यात आलेली नाही परिणामी प्राचीन मंदिरे आता पर्यटकांची आकर्षण केंद्रे बनली आहेत.

मंदिरांचा विकास करून त्यांकडे राज्याला निधी मिळवून देणारे साधन म्हणून पाहिले जात आहे. समाजाचे दिवसागणिक होत असलेले नैतिक अधःपतन, वाढती गुन्हेगारी, स्त्रियांवरील अत्याचार, गल्लीपासून दिल्लीपर्यंत बोकाळलेला भ्रष्टाचार, नात्यांमधील दुरावा या सर्वांवर उपाय म्हणून समाजात आज नैतिक मूल्ये रुजवणे अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी मंदिरे भक्तांच्या ताब्यात देऊन प्रत्येक प्राचीन मंदिरांतून गुरुकुल चालवले जावेत.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.



## रोज सकाळी रिकाम्या पोटी खा अद्रक आणि मध

सध्या पावसाळा सुरू आहे. या ऋतूमध्ये अनेक हंगामी आजार होण्याची शक्यता असते. तर या दिवसांमध्ये आरोग्याची अतिरिक्त काळजी घेण्याची गरज आहे. यासाठी आहारात अशा गोष्टींचा समावेश करणे उचित आहे जे आरोग्यासाठी फायदेशीर आहेत आणि त्यांचे सेवन केल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होते.

अदरक आणि मध हे शतकानुशतके अनेक आजारांवर उपचार करण्यासाठी वापरले जात आहे. आयुवेर्दातही यांचा वापर मोठ्याप्रमाणावर होत असतो. तसेच रोज स्वयंपाक करताना अदरकचा वापर केला जातो. कारण अदरकमध्ये असलेले जिंजरॉल नावाचे संयुग आणि मधात आढळणारे अँटीऑक्सिडंट्स शरीराला अनेक आजारांपासून वाचवण्यास मदत करतात.

**पचन सुधारते** : अदरक आणि मध एकत्र खाल्लयाने पचनसंस्था मजबूत होते. मधामध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म पचन सुधारण्याचे काम करतात. तुम्ही जर दररोज त्यांचे सेवन केले तर बद्धकोष्ठता, आम्लता आणि पोटफुगी यासारख्या समस्यांपासून आराम मिळू शकतो.

**सर्दी आणि खोकल्यापासून आराम** : पावसाळ्यात सर्दी आणि खोकल्यासारख्या समस्यां सारख्या सतावत असतात. अदरकच्या रसात मध टाकून सेवन केल्यास लगेच आराम मिळू शकतो. आल्यामध्ये असलेले अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म घशाची जळजळ कमी करतात. याशिवाय, मध घशातील जळजळ कमी करते. यामुळे खोकल्याच्या समस्येपासून आराम मिळतो.

**दम्यामध्ये फायदेशीर** : अदरक आणि मध हे दम्याचा त्रास असलेल्या लोकांसाठी देखील फायदेशीर मानले जातात. ते दम्याला चालना देण्यास प्रतिबंध करते. याशिवाय फुफ्फुसांच्या संसगार्चा धोका कमी करते. दिवसातून तीन वेळा अदरक आणि मधाचे सेवन करू शकता.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवते** : हंगामी आजारांपासून बचाव करण्यासाठी मजबूत रोगप्रतिकारक शक्ती असणे खूप महत्वाचे आहे. अशावेळेस अदरक आणि मध खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढवता येते. अदरक आणि मध रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी काम करतात.

**वजन कमी होते** : पावसाळ्यात अदरक आणि मधाचे सेवन करून तुम्ही तुमचे वजन नियंत्रित ठेवू शकता.

आल्याच्या रसात मध मिक्स करून त्याचे सेवन करावे लागेल. तुम्ही ते सकाळी रिकाम्या पोटी देखील घेऊ शकता.

## अशोकायन


प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### पटलं तर घ्या!

दिनचर्या आहे व्यस्त
लोक आहेत त्रस्त
शार्ट बट स्विट मॅसेज
पाठविणेच आहे रास्त..!

गृप झालेत भक्कम
वेळेचा आहे वाणवा
पॉईंटेड लीखानाची
अंगी सवय बानवा ..!

वाचन मनन चिंतन
निरीक्षण जो करते
त्याच्याच लेखणीतून
अंतरीचे बोल प्रसवते!

## महाकाली कॉलरी परिसरात अवैध मोहा दारु विक्री

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ ऑगस्ट :** पोलीस स्टेशन, चंद्रपूर शहर येथे दिनांक ५ ऑगस्ट रोजी डि.बी. पथक अधिकारी व पो स्टॉफयह पो. स्टे. परिसरात बॉश ऑकट मोहीम दरम्यान पेट्रोलींग करित असता महाकाली कॉलरी आनंदनगर चंद्रपूर येथे काठी घरामध्ये मोहा सडवा, मोहा दारू, देशी दारू बाळगुन विक्री करीत असल्याचे आढळले.पोलीस निरीक्षक निशीकांत रामटेके यांचे मार्गदर्शनात पी. स्टॉफ, पंच, वजन मापधारक, फोटोग्राफर सह असे घटनास्थळी कारवाई करणे करीता पोहचले असता, काही महीला त्यांचे स्वतःचे राहते घरी मोहा सडवा, मोहा दारू, देशी दारू मिळुन आली.

## घोडपेठ मंडळात महसुल सप्ताहाचे आयोजन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ११ ऑगस्ट** : तहसील कार्यालय भद्रावती येथील घोडपेठ मंडळामध्ये महसूल सप्ताह २०२५ अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे घोडपेठ येथील शेतकरी भवनात सोमवारी मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी तहसीलदार राजेश भांडारकर, सरपंच अनिल खडके, नायब तहसीलदार सुधीर खांडरे, मनोज आकनूरवार, मंडळ अधिकारी जयश्री गणपुरवार, ग्राम महसूल अधिकारी विनोद चिकटे, दिनेश भिसिकर उपस्थित होते.

# कलेक्टर सीईओंनी घेतला अवयवदानाचा निर्णय

### बैठकीतच केली ऑनलाईन नोंदणी, जिल्हाभरात २११४ जणांनी घेतली अवयवदानाची प्रतिज्ञा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११, ऑगस्ट :** शासनाच्या सुचनेनुसार संपूर्ण राज्यात ३ ते १३ ऑगस्ट २०२५ या कालावधीत अवयवदान जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. अवयवदान ही आजच्या काळातील सर्वात मोठी मानवसेवा असून ती अनेकांना जीवनदान देऊ शकते. याच संकल्पनेनुसार जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित बैठकीत प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी ऑनलाईन नोंदणी करून अवयवदानाचा निर्णय घेतला आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, मा.सां. कन्नमवार शास. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेमचंद कन्नाके आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. व्यवहारे म्हणाले, अवयवदानाबाबत जास्तीत जास्त लोकांना माहिती द्यावी. या मोहिमेदरम्यान अवयवदानाविषयी गैरसमज दूर करण्यात येणार आहे. आपण असतांना आणि नसतांनाही समाजाच्या उपयोगी पडू शकतो. ज्यांना अवयवदान करण्याची इच्छा आहे, त्यांनी आरोग्य विभागाची संपर्क करावा.

तसेच आपले नातेवाईक व आजुबाजूच्या लोकांना अवयवदानाविषयी प्रवृत्त करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी उपस्थितांना अवयवदानाची शपथ देण्यात आली.

जिल्हाभरात या मोहिमेदरम्यान आतापर्यंत २११४ अवयवदानाची ऑनलाईन प्रतिज्ञा घेतली आहे. यात जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातर्फे १६५९ तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातर्फे ४५५ जणांचा समावेश आहे.

**अवयवदान करण्याची इच्छा असल्यास**

एखाद्या व्यक्तीस मृत्युनंतर आपल्या अवयवांचे दान करण्याची इच्छा असल्यास त्यांनी कायद्यानुसार संमतीपत्र भरणे आवश्यक आहे. तसेच संमतीपत्रावर एखाद्या जवळच्या नातेवाईकाची सही सुध्दा आवश्यक आहे. हा फॉर्म भरल्यानंतर त्या व्यक्तीस डोनर कार्ड दिले जाईल. जरी डोनर कॉर्डवर सही असली तरी मृत्युनंतर आपल्या जवळच्या नातेवाईकाच्या संमतीशिवाय अवयव दान होऊ शकत नाही. त्यामुळे आपल्या इच्छेविषयी नातेवाईकांना माहिती असणे आवश्यक आहे.

**येथे भरा अवयवदानाचे संमतीपत्र**

शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार https://notto.abdm.gov.in या संकेतस्थळावर अवयवदानाची संमती देऊन आपण प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊ शकतो.

**अवयवदानाची पात्रता**

सर्व वयोगटातील निरोगी व्यक्ती अवयवदान करू शकतात. ब्रेन स्टेम, तीव्र हृदयविकाराचा झटका तसेच अकस्मिक कारणाने झालेला मृत्यु , इत्यादी कारणाने मृत्यु झालेल्या व्यक्तीचे अवयवदान करता येते. ज्या व्यक्तिंचा मृत्यु हा रेबीज, एचआयव्ही, हिपॅटॉयटीस, बुडून मृत्यु होणे, कर्करोग व सेप्टीक व्यक्तींचे अवयवदान करता येत नाही.

# जन सुरक्षा विधेयक हे संविधान विरोधी - प्रा. विजय लोनबले

### जन सुरक्षा विधेयक २०२४ विरोधात मूल येथे कार्यशाळा संपन्न



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर,(मूल) दि.११ ऑगस्ट** : जन सुरक्षा विधेयक-२०२४ हे पुरोगामी जनतेची मुस्कटदाबी करण्याचा घाट असून पुर्णपणे संविधान विरोधी असल्याचे मत समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष यांनी व्यक्त केले.

ते जन सुरक्षा विधेयक विरोधी मार्गदर्शन सभेत बोलत होते.

हा संविधान विरोधी काळा कायदा रद्द करण्याच्या दृष्टीने राज्यभरामध्ये एक मोठे आंदोलन निर्माण करण्यात येत आहे कारण या कायद्यान्वये अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या, संघटन बनवण्याचा, आपल्या अधिकारासाठी ,आपल्या शिक्षणासाठी, आपल्या रोजगारासाठी, आपल्या शेतीविषयक हक्कांसाठी , महिलांच्या अधिकार रक्षणासाठी संघटन बनविणे ,धरणे देणे, आंदोलन करणे, मोर्चा काढणे तर दूरच एकूणच आमच्या स्वातंत्र्याला पूर्णपणे नाकारणारे हे विधेयक आहे असे मत मांडून या विरोधात आंदोलन उभे करण्याच्या दृष्टीने मुल मधील सर्व पुरोगामी संघटनांची आज सभा आयोजित करण्यात आली .

या सभेला मुख्य मार्गदर्शक म्हणून चंद्रपूरचे किशोर जामदार आणि नामदेवराव कन्नाके यांनी मार्गदर्शन केले . प्रत्यक्षात कायद्यामध्ये असलेल्या तरतुदी आणि कायदा तयार करणारे सरकार आणि सरकारची जबाबदार मंडळी जे वक्तव्य करीत आहेत यांच्यामधली तफावत मान्यवरांनी सविस्तरपणे मांडली. कायद्यामध्ये जरी फक्त डाव्या कडव्या संघटना असा उल्लेख करण्यात आला असला तरी कुठलाही प्रकारच्या हक्क अधिकारासाठी कोणत्याही संघटनेचा कोणत्याही पदाधिकारी कोणत्याही पक्षाचा कोणताही कार्यकर्ता किंवा व्यक्तिगतरीत्या सुद्धा कोणी सरकार विरोधात कुठलेही वक्तव्य सुद्धा केले आंदोलन आणि धरणे करणे तर दूरच तरी त्या कायद्यामध्ये त्या व्यक्तीवर आणि संघटनेवर बंदी आणून त्यांना जेलमध्ये टाकण्याचा अधिकार या कायद्यान्वये सरकारला मिळणार आहे असे यावेळी मार्गदर्शकांनी सांगितले.

विशेष म्हणजे न्यायपालिकेला या कायद्याच्या प्रक्रिया मधून संपूर्णतः दूर ठेवण्यात आलेला आहे कारण न्यायालयामध्ये दाद मागण्याची तरतूद या कायद्यामध्ये नाही. तसेच अर्बन नक्षलवाद या नावाखाली जी बोंबाबोंब हे सरकार करीत आहे त्याचा कुठलाही उल्लेख या कायद्यामध्ये नाही आणि म्हणून आपल्या कुठल्याही अधिकारासाठी व हक्कासाठी आंदोलन करण्याचा अधिकार संविधानाने प्रत्येक नागरिकास दिलेला आहे तो संविधानातील मूलभूत अधिकारच गोठवण्याचा कार्यक्रम या कायद्याद्वारे सरकार करीत आहे पण या कायद्याच्या संबंधांमध्ये पुरेशी जागरूकता आणि पुरेशी माहिती नागरिकांना नसल्यामुळे सरकारच्या भुलथापाला जनता बळी पडत आहे. अर्बन नक्षलवादाच्या नावाखाली हा कायदा सरकार बनवत आहे तो संपवण्यासाठी आधीच कायदे अस्तित्वात आहेत. असे असताना संवैधानिकरीत्या कायदेशीर मार्गाने संघटन निर्माण करणाऱ्या आणि आंदोलन करणाऱ्या सर्वसामान्य जनतेला खास करून पुरोगामी कार्यकर्त्यांना सरकारच्या संविधान विरोधी धोरणा विरोधात आवाज उठवण्यापासून वंचित करण्यासाठी हा कायदा बनवण्यात आलेला आहे असेही यावेळी मार्गदर्शकांनी नमूद केले.

मुल शहरांमध्ये आणि तालुक्यामध्ये सुद्धा या कायद्याविरोधात मोठे आंदोलन उभारण्याचा मानस उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. या बैठकीला समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रा. विजय लोणबले, जिल्हा तैलिक महासंघाचे सचिव कैलास चलाख, संभाजी ब्रिगेडचे संदीप मोरे, हिरालालजी भडके मा. दिपक पाटील वाढई, डॉ.राकेश गावतुरे , भूमिपुत्र ब्रिगेडचे शहराध्यक्ष नितेश मॅकलवार, राकेश मोहुर्ले आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# शिक्षणाचा दीप विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवणे हे आमचे ध्येय - डॉ.स्निग्धा कांबळे

### चौगान बुक बँकला दिव्यदीप फाऊंडेशन तर्फे पुस्तकांचे वितरण कार्यक्रमात प्रतिपादन



**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी , दि. ११ ऑगस्ट :** अखंड ज्ञानाच्या ज्ञानसागरातून ज्ञानाचा एक थेंब जरी विद्यार्थ्यांच्या ओंजळीत टाकता आला तरी दिव्यदीप फाऊंडेशन ब्रम्हपुरी ने आपले विद्यार्थ्याप्रतीचे सामाजिक योगदान पूर्ण केले या भावनेतून ब्रम्हपुरी तालुक्यातील चौगान ग्रामपंचायत द्वारा संचालित बुक बँक ला विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजेनुसार पुस्तकांचे भेटस्वरूपात वितरण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच उमेश धोटे होते, तर मार्गदर्शक म्हणून दिव्यदीप फाऊंडेशन चे अध्यक्ष डॉ. स्निग्धा कांबळे तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी, बुक बँक अभ्यासिकेचे संचालक, गावातील मान्यवर, तसेच अभ्यासिकेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष उमेश धोटे यांनी बुक बँक उपक्रमाचा उद्देश म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत ज्ञानाचे दार खुले ठेवणे असून दिव्यदीप फाऊंडेशनने विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार उपयुक्त पुस्तके उपलब्ध करून देऊन शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास हातभार लावला आहे असे सांगत दिव्यदीप फाऊंडेशनचे आभार मानले. डॉ. स्निग्धा कांबळे यांनी केवळ शैक्षणिक साधनसामग्री देणे हे आमच्या संस्थेचे उद्देश नसून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय व ज्ञानार्जनाची चेतना निर्माण करणे, विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्यासाठी प्रोत्साहन देणे आणि शिक्षणाचा दीप विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवणे ही आमची खरी सेवा आहे. हाच आमचा सेवाभाव आहे. त्यामुळे यापुढेही अशा अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांतून गावोगावी ज्ञानाचा दिवा प्रज्वलित करण्याचे आमचे प्रयत्न सुरू राहतील असे सांगितले. संचालन व आभार वैकुंठ टेंभुर्णे यांनी मानले.

# स्व.मोहित राजेंद्र झोटींग यांच्या स्मृतिदिनानिमित्त रोग निदान, उपचार व रक्तदान शिबीर

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस , दि. ११ ऑगस्ट :** दत्तकृपा बहुउद्देशीय संस्था वडकी व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. मोहित राजेंद्र झोटींग यांच्या आठव्या स्मृतिदिनानिमित्त रोगनिदान, उपचार व रक्तदान शिबिराचे आयोजन १२ऑगस्ट रोजी सोनामाता हायस्कुल येथे करण्यात आले आहे. सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र झोटींग हे दरवर्षी स्व. मोहीत यांच्या स्मृतिदिनानिमीत्य सामाजिक जाणिवेतून सामाजिक उपक्रम राबवित असतात. स्व मोहित यांचे सात वर्षांपूर्वी आजाराने निधन झाले होते. आपल्या एकूलत्या



एक मुलाचे देहदान करण्याचा निर्णय राजेंद्र झोटींग यांनी घेऊन नागपूर मेडिकल कॉलेजला त्याचा मृतदेह सुपूर्द केला होता हे विशेष. या आरोग्य व रक्तदान शिबिराचे उद्घाटन आमदार करण देवतळे यांच्या हस्ते होत असून कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चित्तरंजनदादा कोल्हे माजी जी प सदस्य, प्रमुख उपस्थिती प्रितीताई काकडे जिप सदस्या प्रविण कोकाटे माजी सभापती प स , अशोकराव पाटील प स सदस्य, सूखदेव भोरकडे पोलिस निरीक्षक, रुपाली राऊत सरपंच, अनिल धोबे मुख्याध्यापक उपस्थितीत आरोग्य व रक्तदान शिबीर संपन्न होईल. रोगनिदान शिबिराचां तालुक्यातील नागरीकांनी लाभ घ्यावा व रक्तदान शिबीरात रक्तदान करण्यासाठी तरुणांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन, डॉ पंकज टापरे, प्रकाश चिव्हाणे, दिलीप बांगरे, अतूल दांडेकर, डॉ राजश्री टापरे, प्रशांत अहिरकर प्रदिप झोटिंग व दत्तकृपा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# आदिवासी समाज म्हणजे सात्विकता, पराक्रम आणि परिश्रमाचे प्रतीक - आ. सुधीर मुनगंटीवार

### पोंभूर्णा येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त सोहळा आयोजीत

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ ऑगस्ट :** आदिवासी समाज हा केवळ आपल्या सात्विक जीवनशैलीसाठीच नव्हे, तर पराक्रम आणि अथक परिश्रमासाठीही ओळखला जातो. निसर्गाशी एकरूप होऊन जगणारा, परंपरा, संस्कार आणि निष्ठा जपणारा हा समाज देशाच्या विकास प्रवासात मोलाचा वाटा उचलतो. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदीजी मुर्मू यांच्या नेतृत्वातून आदिवासी भगिनींना आणि समाजाला मिळालेला आत्मविश्वास हा अभिमानाचा विषय आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री



आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी जागतिक आदिवासी दिवसानिमित्त पोंभूर्णा येथे आयोजित कार्यक्रमात केले.

जागतिक आदिवासी दिवसानिमित्त पोंभूर्णा येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी गोंडवाना आंदोलन आदिवासी चळवळीचे जिल्हाप्रमुख जगन येलके, प्रदेश महामंत्री अल्काताई आत्राम,सचिव हरी कोडापे, महिला अध्यक्षा उषाताई आलाम, महादेव मडावी, कवडू मडावी, कांता मडावी, गीताताई कुळमेथे, गीताताई कोवे, भीमराव मरसकोल्हे, सामाजिक कार्यकर्ता गणेश परचाके तसेच समाजाच्या महिला व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आमदार मुनगंटीवार यांनी आदिवासी बांधवांशी संवाद साधत आपला आनंद व्यक्त केला. आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांनी एवरेस्ट शिखर सर केले, ही शक्ती त्यांच्या अंगी जन्मजात आहे. योग्य संधी मिळाल्यास हेच विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात जागतिक पातळीवर झेंडा फडकवू शकतात. आदिवासी समाजासाठी राबवल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना प्रभावीपणे त्यांच्या प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवून, त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवणे हीच खरी प्रगती असेल, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले.

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त शीतपेयाचे वाटप



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ११ ऑगस्ट** : शहरातील सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रातर्फे ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनानिमित्त भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांच्या मार्गदर्शनाखाली शीतपेयाचे वाटप करण्यात आले.

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी बांधवांतर्फे शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रातर्फे मिरवणुकीत सहभागी समाज बांधवांना शीतपेयाचे वाटप करण्यात आले तसेच शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी भाजपाचे जिल्हा सचिव विनोद चौधरी, इर्शाद कुरेशी, तुलसीदास ढवस, धनराज पारखी, नितीन काळे, स्वप्नील इंगोले, असगर खान, हेमंत कुमार, गणेश राजुरकर आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ४७ वाळूघाटांवरील बेकायदेशीर वाळू उत्खनन आणि साठा तपासा

### मनसेने राज्याचे खनिकर्म मंत्री भोईर यांना दिले निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ ऑगस्ट :** महाराष्ट्र सरकारचे नवीन वाळू उत्पादन धोरण-२०२५ लागू झाले आहे, परंतु त्या धोरणानुसार वाळू उत्खनन आणि वाहतूक केली जात नाही, उलट एकूण वाळू साठ्याच्या १० टक्के घरमालकांना मोफत वाटण्याच्या सरकारच्या निर्णयाचे उल्लंघन केले जात आहे. या संदर्भात मनसे वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष महेश वासलवार यांनी राज्याचे खनिकर्म मंत्री पंकज भोयर निवेदन पाठवून वाळूघाटधारकांवर दंड आणि फौजदारी कारवाई करून वाळूघाट बंद करण्याची मागणी केली असल्याचे पत्रपरीषदेत सांगीतले.



पत्र परिषदेत त्यांनी सांगितले की, पोंभुर्णा तहसीलच्या वेळवा चेक साठी १०१७७ ब्रास रेती, जुनगावसाठी ४४१७ब्रास, आष्टासाठी २६५० ब्रास आणि थेरगाव वाळूघाटातून २२०८ब्रास वाळू उपलब्ध करून देण्यास जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मान्यता दिली आहे. तथापि, ज्या वाळूसाठी परवानगी देण्यात आली आहे त्या वाळूच्या साठ्याकडे पाहिले तर, तो वाळूचा साठा जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मंजूर केलेल्या वाळूच्या साठ्यापेक्षा किमान १० ते २० टक्के जास्त आहे आणि आतापर्यंत मंजूर वाळूच्या साठ्यापेक्षा कितीतरी पट जास्त वाळू आगाऊ विकली गेली आहे. या दरम्यान, उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या स्तरीय रेती संनियत्रण समितीच्या वेळकाढू धोरणामुळे कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. मूल तहसीलमध्येही अशीच परिस्थिती आहे. या तहसीलमध्ये राजोली ३७१० बास, डोंगरगाव २१२० ब्रास, कोसंबी १५५९० ब्रास, चकनाळेश्वर २१२० ब्रास, मूल आकापूर ३१८० ब्रास आणि नालेश्वर मोकासा १९८८ ब्रास या वाळू पुरवण्याची परवानगी होती, परंतु आता तेथे वाळूचे मोठे ढीग आणि वाळूचा मोठा साठा आहे आणि तेवढ्याच प्रमाणात वाळू विकली गेली आहे, म्हणजेच जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर केलेल्या वाळूच्या किमान २० पट वाळू उपलब्ध आहे आणि त्या वाळूच्या निम्म्याहून अधिक वाळू विकली गेली आहे. यामुळे सरकारला ४०० कोटींहून अधिक महसूल बुडत आहे. महसूल प्रशासन आणि पोलिस प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने हजारो कोटी रुपयांचा हा वाळू व्यवसाय सुरू आहे. तसेच सरकारला कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. या संदर्भात मनसे वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष महेश वसलवार यांनी खनिकर्म राज्यमंत्री पंकज भोयर यांना निवेदन देऊन संबंधित वाळू घाट मालकांवर दंडात्मक आणि फौजदारी कारवाई करावी आणि ते वाळू घाट बंद करावेत अशी मागणी केली आहे. मंत्र्यांनी जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिल्याची माहिती वसलवार यांनी दिली. वाळू घाट धारकांवर कारवाई न झाल्यास मनसे स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मनसे वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष महेश वसलवार, उमाशंकर तिवारी, मनसे उपजिल्हाध्यक्ष राजू कुकडे, मनसे लोकसेवा आयोगाचे जिल्हाध्यक्ष रमेश काळबांधे, सुनील गुढे हे पत्रकार परिषदेत उपस्थित होते

# 'हर घर तिरंगा' अभियानाचा जिल्हाधिऱ्यांकडून आढावा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ ऑगस्ट** : केंद्र शासनाकडून २ ते १५ ऑगस्ट या दरम्यान 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत विविध कार्यक्रम / उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत सुचना प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांनी आज (दि.११) जिल्ह्यात राबविण्यात येणा-या उपक्रमांचा यंत्रणेकडून आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयातून दूरदृष्यप्रणालीद्वारे डॉ. व्यवहारे यांनी संवाद साधून 'हर घर तिरंगा' अंतर्गत विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सुचना दिल्या. जिल्हास्तरापासून ग्रामस्तरापर्यंत सर्वांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन



करावे, सर्व विभागांनी यात पुढाकार घ्यावा, शाळांमध्ये या निमित्ताने रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, देशभक्तीपर वक्तृत्व स्पर्धा आदींचे आयोजन करावे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी तिरंगा रॅलीचे आयोजन करावे, अशाही सुचना त्यांनी दिल्या.

'हर घर तिरंगा' अभियानाचे तीन टप्पे असून २ ते ८ ऑगस्ट पहिला टप्पा, ९ ते १२ ऑगस्ट दुसरा टप्पा तर १३ ते १५ ऑगस्ट तिसरा टप्पा आहे. तिस-या टप्प्यामध्ये ध्वजारोहण, समारंभ, सर्वांचा सहभाग, शहरी आणि ग्रामीण भागात विविध उपक्रमांना प्रसिध्दी, तिरंगासोबत सेल्फी असे उपक्रम आहेत. तर पहिल्या आणि दुस-या टप्प्यामध्ये शाळेच्या भिंती आणि फलक तिरंगा प्रेरीत कलाकृतींनी सजवणे, तिरंगा प्रदर्शनाचे आयोजन, विविध स्पर्धा आदींचा समावेश होता.

बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार तसेच दूरदृष्यप्रणालीद्वारे सर्व विभाग प्रमुख, सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, न.प. मुख्याधिकारी आदी उपस्थित होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक


मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३

* स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# शिव्यांमध्ये दिल्लीकर आघाडीवर

शिव्या हा कोणत्याही भाषेचा अविभाज्य भाग असतो, असे भाषाविषयक तज्ज्ञ म्हणतात. अर्थात शिव्या देणे वाईटच आहे. मात्र शिव्यांच्या व्युपत्तीपासून त्या कशा बदलत गेल्या, यासंदर्भातील अभ्यास अनेक भाषा तज्ज्ञांनी यापूर्वी केला आहे. मन मोकळे करण्यासाठी, राग व्यक्त करण्यासाठी तोंडून अपशब्द निघतो, असे शिव्या देणारे सहज मान्य करतात. शिव्या देणाऱ्या राज्यांच्या यादीमध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे.

भारतातील कोणत्या राज्यात सर्वाधिक शिव्या दिल्या जातात, या प्रश्नाचे उत्तर दिल्ली असे आहे. दिल्लीतील लोक सर्वात जास्त अपशब्द वापरतात, असे एका सर्वेक्षण अहवालात असे दिसून आले आहे. आया-बहिणींवरुन शिव्या आणि मुलींना लक्ष्य करणारे अपशब्द राजधानीत सर्वात सामान्यपणे वापरले जातात. सर्वेक्षणानुसार दिल्लीतील ८० टक्के लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात अपशब्द वापरतात. 'सेल्फी विथ डॉटर फाउंडेशन'चे संस्थापक आणि महर्षी दयानंद विद्यापीठातील प्रॅक्टिसचे प्राध्यापक डॉ. सुनील जगलान यांनी 'गाली बंद घर अभियान' सुरू केले आणि या




उपक्रमाचा एक भाग म्हणून वेगवेगळ्या राज्यांमध्ये दीर्घकालीन सर्वेक्षण करण्यात आले. ११ वर्षांच्या कालावधीत करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात ७० हजार लोकांकडून प्रतिसाद नोंदवण्यात आला. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या लोकांमध्ये वेगवेगळ्या समाजिक स्तरांतील प्रतिनिधी होते. तरुण, पालक, शिक्षक, डॉक्टर, ऑटो चालक, शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, पोलिस, वकील, व्यापारी, स्वच्छता कर्मचारी, प्राध्यापक आणि पंचायत सदस्य यांचा समावेश होता.

सर्वाधिक शिव्या देणाऱ्या राज्यांमध्ये पंजाब दुसऱ्या क्रमांकावर आहे. पंजाबमधील ७८ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरल्याचे मान्य केले आहे. उत्तर प्रदेश (यूपी) आणि बिहार प्रत्येकी ७४ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरतो असे म्हटले. राजस्थानमधील ६८ टक्के आणि हरियाणा ६२ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरत असल्याचे मान्य केले. महाराष्ट्रातील ५८ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरतो असे म्हटले आहे. या यादीत महाराष्ट्र सातव्या स्थानावर आहे. त्याखालोखाल गुजरातमधील ५५ टक्के लोकांनी अपशब्द वापरतो असे मान्य केले आहे. मध्य प्रदेशमधील ४८ टक्के आणि उत्तराखंड ४५ टक्के लोकांनी आपण अपशब्द वापरत असल्याचे मान्य केले आहे.

सर्वात कमी शिव्या देणाऱ्या राज्यांच्या यादीमध्ये जम्मू आणि काश्मीर सर्वात खालच्या क्रमांकावर आहे. येथील फक्त १५ टक्के लोकांनी अपशब्द वापरल्याचे सांगितले आहे.

# कॅलिडोस्कोप



## इंग्रज बनला 'शाही तुकडा' फॅन!

भारतीय जेवणाची आवड परदेशी लोकांसाठी नवीन नाही. येथील चव गोऱ्या लोकांच्या जिभेवरही रेंगाळते. पण पहिल्यांदाच शाही तुकडा खाण्यासाठी एक परदेशी व्यक्ती सुरुवातीला संकोच करत होती. त्याला त्याची चव कशी असेल हे माहीत नव्हते. पण त्याने तो खाल्ला तेव्हा त्याने आनंदाने उड्यचा मारल्या. दिल्लीच्या बाजारात फिरत असताना त्याची नजर एका मोठ्या थाळीत सजवलेल्या शाही तुकड्यावर पडली. त्याने प्रथम दुकानदाराकडून त्याचे नाव आणि दर निश्चित केला. दुकानदाराकडून शाही तुकडा घेऊन तो रेस्टॉरंटमध्ये गेला. रील करण्यासाठी कॅमेरा सुरु करून तो म्हणतो, माझ्याशिवाय या छोट्या रेस्टॉरंटमध्ये कोणीच नाही. शाही तुकड्याचा वास घेतल्यानंतर तो एक विचित्र प्रतिक्रिया देतो. त्याचा छोटा तुकडा घेतो आणि त्याची चव चांगली नसेल असे समजून जिभेवर ठेवतो. प्रत्यक्षात जिभेवर तो तुकडा ठेवल्यानंतर त्याचा मूडच बदलला. तो आनंदाने उड्या मारायला लागला. तो म्हणाला, यापेक्षा जगात दुसरे काहीही चांगले असू शकत नाही. मी याला १० पैकी १० गुण देईन. यानंतर तो पटकन ते संपवून तिथून निघून जातो. शाही तुकडा एक गोड पदार्थ आहे. तो ब्रेड, क्रीम आणि देशी तूप वापरून बनवला जातो.



## लोखंडाशिवाय बांधलं मंदिर

हरयाणातल्या अंबाला सिटीतल्या गीतानगरीमध्ये अनोख्या जैन मंदिराची उभारणी सुरू आहे. जैन मुनी विजय इंद्रदिन्न सुरिश्वर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हे मंदिर उभारलं जात आहे. या मंदिराचा आकार गोल असेल. हे मंदिर बांधण्यासाठी संगमरवराचा वापर केला जात आहे. या मंदिराच्या उभारणीत लोखंडाचा अजिबात वापर झालेला नाही. लोखंडाचा एखादा खिळाही ठोकण्यात आलेला नाही. अशा प्रकारचं हे उत्तर भारतातलं पहिलंच मंदिर आहे. २०११ मध्ये या मंदिराच्या उभारणीला सुरूवात करण्यात आली. या मंदिराचा नकाशा कोणत्याही वास्तुशास्त्रज्ञाने नाही तर खुद्द जैन मुनी विजय रत्नाकर सुरिश्वर यांनी तयार केला आहे. त्यांच्या संकल्पनेनुसार हे मंदिर बांधलं जात आहे. या मंदिराचं बांधकाम जैन स्थापत्यशैलीत केलं जात आहे. संगमरवरावरचं नक्षीकाम राजस्थानमध्ये केलं जात आहे. असं हे अनोखं जैन मंदिर अंबालाची शान ठरणार आहे.

## असा हा नेप्च्यून



आपली सूर्यमाला अनेक रहस्यांनी भरलेली आहे. पृथ्वी हा सौरमालेतला तिसरा ग्रह. या पृथ्वीवरच जीवसृष्टी बहरली, फुलली. माणसाला मंगळ ग्रहाचं प्रचंड आकर्षण आहे. मंगळावर जीवसृष्टीचं अस्तित्व आहे का, याचा शोध सुरू आहे. आपल्या सौरमालेतल्या चार ग्रहांवर दगड, माती नाही तर वायू आहेत. म्हणूनच हे ग्रह खूप धोकादायक मानले जातात. नेपच्युन, गुरू, शनी आणि युरेनस असे हे चार ग्रह आहेत. नेपच्यून हा ग्रह पृथ्वीपासून खूप लांब आहे. तसंच तो धोकादायकही आहे. या ग्रहावरचं तापमान उणे २०० इतकं असतं. म्हणजे या ग्रहावर जाण्याचा विचारही आपण करू शकणार नाही. २३ सप्टेंबर १८४६ रोजी या दिवशी नेपच्यूनला पहिल्यांदाच दुर्बिणीतून पाहिलं गेलं. या ग्रहाला नेपच्यून हे नाव देण्यात आलं. या ग्रहाच्या अस्तित्वाच्या शक्यता त्याच्या शोध लागण्याआधीच व्यक्त करण्यात आल्या होत्या.

नेपच्यून हे रोमन देवतेचं नाव आहे. नेपच्यूनवर मिथेन वायूपासून तयार झालेले ढग आहेत. इथे हवा खूप वेगाने वाहते. इथले वारे १५०० मैल प्रति तास एवढ्या वेगाने वाहतात. नेपच्यूच्या वातावरणात कार्बनचं प्रमाण बरंच जास्त असल्यामुळे इथे हिऱ्यांचा पाऊस पडतो. असा हा नेपच्यून सर्वार्थाने अनोखा आहे.




## सर, मी विकला गेलोय!

मध्यंतरी एक मजेदार राजीनाम्याचा ईमेल 'सोशल मीडिया'त प्रचंड व्हायरल झाला होता. या ईमेलमध्ये त्या व्यक्तीने इतक्या प्रामाणिकपणे आणि मोकळेपणाने आपली गोष्ट लिहिली आहे की ती वाचून कोणीही आपले हसू आवरू शकत नाही. मुंबईतील 'हिंग्लिश' या ब्रँडचे संस्थापक आणि 'सीईओ' शुभम गुणे यांनी 'लिंक्डइन'वर मजेदार राजीनामापत्र शेअर केले होते. अल्पावधीतच ते व्हायरल झाले. 'ईमानदार इस्तीफा' या कॅप्शनसह ते शेअर करण्यात आले आहे.

या ईमेलमध्ये 'नमस्ते सर, मी विकला गेलोय. समोरची कंपनी मला चार पैसे जास्त देतेय', असे लिहिले आहे. कमेंट सेक्शनमध्ये या ईमेलला भरघोस प्रतिसाद मिळाला असून अनेकांनी याला प्रत्येक कर्मचाऱ्याच्या मनातील भावनांचा आवाज म्हटलंय. एका यूजरने मजेशीरपणे म्हटले, 'तुमच्या ईमेलमधील स्पष्टतेचा हा खरा अर्थ आहे. आम्ही नेहमीच याला चुकीच्या पद्धतीने समजत आलो आहोत. दुसऱ्या एका यूजरने लिहिले, 'हा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या अंतरात्म्याचा आवाज आहे.' ही मजेदार पोस्ट आणि त्यावरील प्रतिक्रिया यामुळे 'सोशल मीडिया'वर या राजीनामा पत्राची जोरदार चर्चा झाली.

अनेकांनी या ईमेलच्या साधेपणाला आणि प्रामाणिकपणाला दाद दिली आहे. या ईमेलने कर्मचाऱ्यांच्या मनातील खऱ्या भावना हलक्या-फुलक्या पद्धतीने मांडल्या असून इंटरनेटवर क्रिएटिव्हिटी आणि विनोद याची कमतरता नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले.

## विवाहबाह्य संबंधात कांचीपूरम्‌ची आघाडी

भारतात विवाहबाह्य संबंध आता केवळ महानगरांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. आता टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील लोकदेखील नात्यांसाठी 'पर्याय' शोधत आहेत. जगातील सर्वात लोकप्रिय अतिरिक्त विवाहबाह्य डेटिंग प्लॅटफॉर्म 'ॲशले मॅडिसन' च्या जून २०२५ च्या आकडेवारीने याची पुष्टी केली आहे. या अहवालानुसार, तामिळनाडूतील कांचीपूरम् हे छोटे शहर या वेळी भारतातील सर्वाधिक 'ॲशले मॅडिसन' वापरणारे शहर बनले आहे.



गेल्या वर्षी हे शहर १७ व्या स्थानावर होते आणि आता अचानक ते दिल्ली आणि मुंबईसारख्या मेट्रो शहरांना मागे टाकत पहिल्या क्रमांकावर आले आहे. कांचीपूरम् हे भारतातील विवाहबाह्य संबंधाचे हब बनले आहे. रेशमी साड्या आणि मंदिरांसाठी ओळखले जाणारे कांचीपूरम् आता 'ॲशले मॅडिसन'च्या आकडेवारीनुसार वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. या शहराची लोकसंख्या फक्त २ लाख आहे. परंतु येथील विवाहबाह्य डेटिंगच्या अनेक घटनांनी मोठ्या महानगरांना मागे टाकले आहे. या वर्षीच्या टॉप २० यादीत मुंबईचे नाव कुठेही नाही. तर दिल्ली-एनसीआरमधील ९ भागांचा या यादीत समावेश आहे. यामध्ये मध्य दिल्ली, दक्षिण पश्चिम दिल्ली, पूर्व दिल्ली, दक्षिण दिल्ली, पश्चिम दिल्ली, उत्तर पश्चिम दिल्ली, गुडगाव, गाझियाबाद आणि नोएडा (गौतम बुद्ध नगर) सारखी शहरे समाविष्ट आहेत.

या यादीत जयपूर, रायगड, कामरूप आणि चंदीगडसारखी इतर अनेक लहान शहरेदेखील समाविष्ट आहेत. एप्रिल २०२५ मध्ये 'ॲशले मॅडिसन'ने 'यूगव्ह'द्वारे एक सर्वेक्षण प्रसिद्ध केले. त्यात असे दिसून आले, की भारत आणि ब्राझीलमध्ये विवाहबाह्य संबंधांचे प्रमाण सर्वाधिक आहे. या सर्वेक्षणात आपले कधी ना कधी विवाहबाह्य संबंध होते, असे ५३ टक्के भारतीयांनी कबूल केले. या अहवालातून भारतात पारंपारिक संबंधांची व्याख्या बदलत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अगदी आत्तापर्यंत समाजात लग्न आणि वचनबद्धतेबद्दल कठोर मूल्ये होती, तर आता लोक उघडपणे त्यांचे पर्याय शोधत आहेत. 'ॲशले मॅडिसन'सारखे प्लॅटफॉर्म अशा लोकांसाठी 'गुप्त मार्ग' बनत आहेत.



## मंत्री पत्नीलाच विसरले!

एका अत्यंत विचित्र घटनेमुळे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान मध्यंतरी इंटरनेटवर चर्चेचा विषय ठरले होते. केंद्रीय कृषिमंत्री एक दिवसाच्या गुजरातच्या धार्मिक दौऱ्यावर होते. या भेटीदरम्यान त्यांनी जुनागडमधील सोमनाथ ज्योतिर्लिंग मंदिर आणि गीर राष्ट्रीय उद्यानाला भेट दिली. नंतर ते 'पीनट रिसर्च सेंटर'च्या शेतकऱ्यांशी आणि 'लखपती दीदी' योजनेअंतर्गत येणाऱ्या लाभार्थींशी संवाद साधणार होते. त्यांना रात्री आठ वाजता राजकोटहून विमानाने प्रवास करायचा होता. त्यामुळे ते कार्यक्रम, भेटीगाठी लवकर संपवण्याच्या घाईत होते. संशोधन केंद्राच्या भेटीदरम्यान, त्यांनी कर्मचाऱ्यांसोबत कामाचा आढावा घेतला तर त्यांच्या पत्नी, साधना प्रतीक्षागृहात बसल्या होत्या. त्यानंतर शिवराज यांनी 'लखपती दीदी' योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला.

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर ते वारंवार त्यांच्या घड्याळाकडे पाहत होते. आपल्या भाषणामध्येही शिवराज सिंह चौहान यांनी, राजकोटचा रस्ता खराब आहे, पुढच्या वेळी मी आरामात येईन, असे विधान करत आपल्याला घाई असल्याचे सूचित केले. त्यांनी आपले भाषण आटोपते घेतले. त्यानंतर शिवराज सिंह चौहान ताफ्यासह जुनागढहून राजकोटच्या दिशेने घाईघाईत निघाले. दुसरीकडे साधना गिरनारला भेट देऊन परत आल्या होत्या आणि प्रतीक्षागृहात शिवराज सिंह चौहान यांची वाट पाहत बसल्या होत्या. सुमारे १० मिनिटे प्रवास केल्यानंतर साधना त्यांच्यासोबत अथवा ताफ्यातील एकाही कारमध्ये नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. मग त्यांनी ताबडतोब पत्नीला फोन केला आणि ते ताफ्यासह परतले. पत्नीला घेऊन ते राजकोटला रवाना झाले.



## पृथ्वीवरचा चंद्र

२० जुलै १९६९ या दिवशी अमेरिकेचे अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर पाऊल ठेवलं. हे चंद्रावर पडलेलं मानवाचं पहिलं पाऊल होतं. आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर अमेरिकेचा झेंडा रोवला. आपलं हे छोटंसं पाऊल अखिल मानवजातीसाठी मोठी उडी ठरेल, असं त्यांनी नमूद केलं होतं. मानवाची चंद्रावरही ही स्वारी ऐतिहासिक ठरली. हे अमेरिकेचं मोठं यश होतं. मात्र या यशात आईसलॅंडचाही वाटा होता. 'अपोलो ११' या मोहिमेआधी अंतराळवीरांना चंद्रासारखं वातावरण असणाऱ्या पृथ्वीवरच्या एका ठिकाणी पाठवण्यात आलं होतं. हे ठिकाण आईसलॅंडमध्ये आहे. आईसलॅंडच्या उत्तर किनाऱ्यावर असणाऱ्या हुसाविक या ठिकाणी अंतराळवीरांना प्रशिक्षण देण्यात आलं. हुसाविक हे २३०० मच्छिमारांचं छोटंसं शहर होतं. नासाने १९६३ ते १९६७ या काळात ३२ अंतराळवीरांना या ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठवलं होतं. आजवर १२ लोकांनी चंद्रावर पाऊल ठेवलं आहे. अंतराळ मोहिमेआधी यापैकी नऊ लोक हुसाविक या ठिकाणी आले होते. यात नील आर्मस्ट्राँगचाही समावेश होता. म्हणूनच हुसाविक या ठिकाणाचं मोठं महत्त्व आहे.

## खाऱ्या पाण्याचं सरोवर



मध्य आशियातल्या देशांमध्ये असणाऱ्या पामीर पठाराला जगाचं छप्पर म्हटलं जातं. हे पठार आणि पर्वतरांगांच्या मध्ये एक सरोवर आहे. हे सरोवर समुद्रसपाटीपासून सुमारे चार हजार मीटर उंचीवर आहे. काराकुल सरोवर असं त्याचं नाव. हे सरोवर दक्षिण अमेरिकेतल्या टिटिकाका सरोवरापेक्षाही अधिक उंचीवर आहे. ते सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीचं असल्याचं बोललं जातं. पृथ्वीवर उल्कापिंड पडल्यामुळे तयार झालेल्या खड्ड्यामुळे या सरोवराची निर्मिती झाली आहे. हे सरोवर ३८० चौरस मीटर परिसरात पसरलं आहे. ते खूप खोलही आहे. हे स्थान चारही बाजूंनी बर्फाच्छादित पर्वतरांगांनी घेरलं आहे. या सरोवरातल्या पाण्याचा रंग दिवसभरात बरेचदा बदलतो. रात्रीच्या वेळी या सरोवरातल्या पाण्याचा रंग काळाकुट्ट दिसतो. म्हणूनच या सरोवराचं नाव काराकुल असं ठेवण्यात आलं आहे. काराकुल म्हणजे काळा. काराकुल हे आशिया खंडातलं सर्वात खाऱ्या पाण्याचं सरोवर आहे. यात फक्त एका प्रजातीचा मासा राहतो. त्याशिवाय दुसरा कोणताही जीव या खाऱ्या पाण्याच्या सरोवरात टिकून राहू शकत नाही.

# महाराष्ट्रात परतणार सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार

## राज्य सरकारने लंडनमधील लिलाव जिंकला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार महाराष्ट्र सरकारने लिलावात जिंकली असून महाराष्ट्रात आणण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी दिली आहे. लंडनहून ही शौर्याची निशाणी आता आपल्या मातीत परत येणार असून, हा महाराष्ट्राचा विजय असल्याची प्रतिक्रिया शेलार यांनी दिली आहे.

आशिष शेलार यांनी ट्विट करत म्हणाले, छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील थोर सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार महाराष्ट्र सरकारने लिलावातून जिंकली होती, लंडनहून ही शौर्याची निशाणी आता आपल्या मातीत परत येणार असून, हा महाराष्ट्राचा विजय आहे. ही तलवार म्हणजे मराठ्यांच्या शौयार्ची, मुत्सद्देगिरीचे आणि वैभवाची अमूल्य निशाणी असून, अशा लिलावात पहिल्यांदाच आपण ऐतिहासिक वारसा जिंकून आणलेला आहे.

पुढे ते म्हणाले, या ऐतिहासिक तलवारीचा लिलाव जिंकण्यापासून ते ती ताब्यात घेण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका असलेले पंतप्रधान मोदी, भारताचे परराष्ट्र मंत्रालय, लंडन येथील भारतीय दूतावासाचे अधिकारी, मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सर्व अधिकारी यांचे मनःपूर्वक आभार!

संबंधित तलवार ही युरोपियन शैलीतील आहे. त्यावर देवनागरी लिपीने अंकित करण्यात आले आहे. एवढेच नाही तर तिला सोन्याने जडवलेली मूठही आहे. तसेच हिरव्या विणलेल्या लोकरीची पकडही तलवारीला आहे. या तलवारीत एकेरी ब्लेड आहे.



### तलवार राज्य सरकारच्या ताब्यात आल्याचा विशेष आनंद - मुख्यमंत्री फडणवीस



आपल्या मराठा साम्राज्यातील एक मौलिक आणि ऐतिहासिक ठेव असलेली, नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार ही लिलावात निघाली होती. ती राज्य सरकारने २९ एप्रिल रोजी खरेदी केल्यानंतर, आज त्याचा प्रत्यक्ष ताबा राज्य सरकारकडे आला आहे.
माझे सहकारी आणि राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी लंडनमध्ये हा ताबा स्वीकारला. काही तांत्रिक कारणांमुळे ती मध्यस्थामार्फत खरेदी करावी लागली होती. पण, आता ती त्या मध्यस्थामार्फत सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करीत त्यांनी ताब्यात घेतली आहे.आता ही तलवार लवकरच महाराष्ट्रात येईल आणि त्याचा कायमस्वरुपी ताबा हा राज्य सरकारकडे असेल. छत्रपती शाहू महाराजांनी सेनासाहिबसुभा ही उपाधी राजे रघुजी भोसले यांना दिली होती. त्यांनी मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला होता, असे फडणवीस म्हणाले.

**तलवार ब्रिटीशांनी लुटली की अधिकाऱ्यांनी चोरली?**
संबंधित तलवार कंपनीपर्यंत कशी पोहोचली हे मोठे कोडेच आहे. १८५३ ते १८६४ या कालावधीत महाराज श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोंसले (दुसरे) उर्फ (आप्पासाहेब महाराज) यांच्या नेतृत्वात मराठा विरुद्ध ब्रिटिश युध्द झाले होते. त्याच कालावधीत इंग्रजांनी ब्रिटीशांनी नागपूरकर भोसल्यांचा खजिना लुटला होता. त्यात अनेक रत्नजडित दागदागिने, शस्त्रसाठा व तलवारींची लूट करण्यात आली होती. त्या लुटीत कदाचित ही तलवार गेली असावी अशी शक्यता आहे. याशिवाय एखाद्या ब्रिटिश अधिकाऱ्याने ही तलवार लपून नेली असावी व कालांतराने तिची विक्री केली असावी अथवा कुणाला तरी भेट दिली असावी असा अंदाज आहे. पण हे ऐतिहासिक शस्त्र लिलाव करणाऱ्या कंपनीकडे कशी आली? हा मोठा प्रश्न आहे.

# म्हणून त्यांची दादागिरी...

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



गेल्या आठवड्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादले आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयानंतर अनेकांनी त्यांच्यावर टीका केली आहे. याचबरोबर या निर्णयावर ब?्या वाईट प्रतिक्रियाही येत आहेत. अशात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या मुद्द्यावर भाष्य केले आहे.

नितीन गडकरी यांनी नुकतेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणावर थेट टीका केली आणि म्हटले की, जे दादागिरी करत आहेत, ते आर्थिकदृष्ट्या मजबूत आहेत आणि त्यांच्याकडे तंत्रज्ञान आहे, म्हणून ते असे करत आहेत.

नागपूरमधील विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे व्याख्यान देताना गडकरी म्हणाले की, जर आपला निर्यात आणि आर्थिक विकास दर वाढला, तर आपल्याला कोणाकडेही जाण्याची गरज भासेल असे मला वाटत नाही. जे दादागिरी करत आहेत, ते आर्थिकदृष्ट्या मजबूत आहेत आणि त्यांच्याकडे तंत्रज्ञान आहे, म्हणून ते असे करत आहेत.

जर आपण आर्थिकदृष्ट्या मजबूत झालो आणि तंत्रज्ञानातही प्रगती केली, तरी आपण कोणालाही धमकावणार नाही, कारण हे आपल्या संस्कृतीत नाही. आपली संस्कृती आपल्याला शिकवते की जगाचे कल्याण सर्वात महत्त्वाचे आहे, असे ते पुढे म्हणाले.

यावेळी बोलताना नितीन गडकरी यांनी नवोपक्रमाचे महत्त्वही अधोरेखित केले. ते म्हणाले, आज जगातील सर्व समस्यांवर विज्ञान, तंत्रज्ञान आणि ज्ञान हाच उपाय आहे. जर आपण या तीन गोष्टींचा वापर केला, तर आपल्याला कधीही जगासमोर झुकावे लागणार नाही. संशोधन केंद्रे, आयआयटी आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांनी देशाच्या गरजा लक्षात घेऊन संशोधन केले पाहिजे. सर्व जिल्ह्यांमध्ये, राज्यांमध्ये आणि प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या गोष्टी आहेत. हे लक्षात ठेवून काम करावे लागेल. जर आपण असे काम सतत केले, तर आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर तिप्पट होईल.

ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट रोजी भारतीय वस्तूंवर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केल्यानंतर दोन्ही देशांमध्ये व्यापार तणाव वाढला आहे. त्यानंतर नितीन गडकरींची ही प्रतिक्रिया आली आहे. यामुळे भारतावरील एकूण टॅरिफ ५० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. या टॅरिफ वाढीचा फटका कापड आणि रत्नांपासून ते औषधनिर्माण आणि ऑटो पार्ट्सपर्यंत विविध क्षेत्रांना बसणार आहे.

# खंडणीखोरांचे सरदार कोण? हे सर्वश्रूत

## उद्धव ठाकरेंवर भाजपचा पलटवार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :



भाजपने देवेंद्र फडणवीस हे चीफ नव्हे तर थीफ मिनिस्टर असल्याची उद्धव ठाकरे यांची टीका जोरकसपणे फेटाळून लावली आहे. या प्रकरणी या भगव्या पक्षाने ठाकरेंवरच खंडणीखोरांचे सरदार असल्याचा पलटवार केला आहे.

उद्योगपतींच्या घराबाहेर जिलेटीन ठेवून तुमच्या नेतृत्वात शंभर कोटींची वसुली सुरू होती. जनता हे विसरली नाही. त्यामुळे फडणवीसांवर टीका करताना आपला भूतकाळ आठवा, असे भाजपने ठाकरेंवर पलटवार करताना म्हटले आहे.

उद्धव ठाकरे यांनी सोमवारी भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून महायुती सरकारवर घणाघात केला होता. तसेच कथित मतचोरीचा दाखला देत देवेंद्र फडणवीस हे चीफ नव्हे तर थीफ मिनिस्टर असल्याचाही आरोप केला होता. त्यांची ही टीका भाजपच्या चांगलीच जिव्हारी लागली.

राज्याचे महसूल मंत्री तथा ज्येष्ठ भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणी त्यांच्यावर पलटवार केला. तसेच फडणवीसांवर टीका करण्यापूर्वी उद्धव ठाकरे यांनी स्वतःला आरशात पहावे असा टोलाही हाणला.

बावनकुळे म्हणाले, उद्धव ठाकरे, खंडणीखोरांचा सरदार कोण आहे? हे जनतेला माहिती आहे. कोण चीफ मिनिस्टर आहे? आणि कोण थीफ मिनिस्टर हे देखील महाराष्ट्रातील जनतेने दाखवून दिले आहे. उद्योगपतींच्या घराबाहेर जिलेटीन ठेवून तुमच्या नेतृत्वात शंभर कोटींची वसुली सुरू होती हे जनता विसरली नाही, असेही बावनकुळे यांनी म्हटले आहे.

# काँग्रेस नेत्याविरोधात काँग्रेसच रस्त्यावर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
नागपूर जिल्ह्यातील काँग्रेसचे माजी प्रदेश सरचिटणीस मुजीब पठाण यांनी मोर्चा काढून काँग्रेस नेते व माजी मंत्री सुनील केदार यांना बँक घोटाळाप्रकरणी शिक्षा करण्याची मागणी केली आहे.
काँग्रेस नेते व माजी मंत्री सुनील केदार नागपूर जिल्हा सहकारी बँकेतील घोटाळाप्रकरणी दोषी ठरले आहेत. ते सध्या जामिनावर आहेत. नागपूर जिल्हा काँग्रेसवर त्यांचे वर्चस्व आहे. त्यांच्या राजकीय प्रभावामुळे जिल्ह्यात नवीन नेतृत्व समोर येत नसल्याचे काँग्रेसमधील काही पदाधिकारी बोलत आहेत. त्यामुळे पक्षातील अनेक नेते, पदाधिकारी नाराज आहेत. परंतु कोणीही केदार यांना उघडपणे आव्हान दिले नव्हते. परंतु मुजीब पठाण यांना प्रदेश कार्यकारिणीतून डच्चू देण्यात आल्याने त्यांचे समर्थक संतप्त झाले.
बुटीबोरी राजकीय पक्षासाठी हे ठिकाण महत्त्वाचे आहे. येथे मुजीब पठाण प्रभाव राखून असल्याचे त्यांनी काढलेल्या मोर्चातून दिसून आले. या मोर्चात मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते आणि जनता सहभागी झाली होती.
सुनील केदार यांच्या विरोधात नागपूर ग्रामीण काँग्रेसमध्ये असंतोष वाढत आहे . मुजीब पठाण यांनी नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणी दोषी ठरलेल्या केदार यांना शिक्षा करण्याची मागणी केली आहे. केदार यांच्याविरोधात नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या १५० कोटी रुपयांच्या घोटाळ्या प्रकरणी काँग्रेसजणांनी मोर्चा काढून आश्चर्याचा धक्का दिला.

# महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानाचे पाच नवे विक्रम




## एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
शून्य विद्युत अपघातासाठी जनजागृती अभियानातील विविध उपक्रमांत लोकसहभागाचे महावितरणने नवीन पाच विक्रम नोंदवून एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान प्राप्त केले आहे.

या दोन्ही संस्थांच्या वतीने सोमवार ११ ऑगस्ट रोजी पाचही विक्रमाच्या नोंदीचे प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून महावितरणचा गौरव करण्यात आला. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या संकल्पनेतून विद्युत सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानातील लोकसहभागाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्डने घेतल्याबद्दल त्यांनी सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा मयंक शाह यांनी विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांची घोषणा केली. त्यांनी या दोन्ही संस्थांच्या वतीने संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक परेश भागवत (मानव संसाधन), प्रसाद रेशमे (प्रकल्प), सौ. स्वाती व्यवहारे (वित्त) यांना प्रमाणपत्र व सन्मानपदक प्रदान करून महावितरणचा सन्मान केला.

एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या परीक्षक कश्मिरा शाह यांनी महावितरणच्या पाचही विक्रमांची माहिती दिली. संचालक राजेंद्र पवार यांनी सांगितले, की लोकसहभागातून शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे या अभियानाची व्याप्ती आणखी वाढविण्यात येईल.

महावितरणने यंदा २० व्या वर्धापन दिनानिमित्त दि. १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते यात सुरक्षा संदेश देणाऱ्या मॅरेथॉनमध्ये ११ हजार ८८१, ऑनलाइन प्रश्नमंजूषेत ९६ हजार १५०, शालेय निबंध व चित्रकला स्पर्धेत ७ हजार ५९३, विद्युत सुरक्षेच्या रॅलीमध्ये २७ हजार १५५ जण सहभागी झाले होते. तसेच ६ जूनला एकाचवेळी ४२ हजार २०१ जणांनी विद्युत सुरक्षेची शपथ घेतली.

यासह महावितरणकडून १ कोटी ९२ लाख ७९ हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएसद्वारे तर ३५ लाख ७३ हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला. या सर्व उपक्रमांत तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.

भारत सरकारकडे नोंदणीकृत व वर्ल्ड रेकॉर्ड युनिव्हर्सिटीशी संलग्न एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आशियातील सर्व प्रमुख राष्ट्रीय बुक ऑफ रेकॉर्ड्सचे परीक्षण करून नोंदी घेतल्या जातात.

त्यानुसार महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानामध्ये प्रामुख्याने विद्युत सुरक्षा रॅली, मॅरेथॉन, विद्युत सुरक्षेची शपथ, ऑनलाइन प्रश्नमंजूषा तसेच एसएमएस व इमेलद्वारे ग्राहक संवादामध्ये लोकसहभागाच्या विक्रमांची नोंद केली. त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. त्यानंतर या नोंदी एशिया बुक ऑफ रेकॉर्डकडे पाठविण्यात आल्या. त्यांच्याकडून आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड प्रोटोकॉलनुसार परीक्षण झाल्यानंतर या विक्रमांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

कार्यक्रमात कार्यकारी संचालक परेश भागवत यांनी अभियानाची माहिती दिली. उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमाला मुख्य अभियंते सर्वश्री मनीष वाठ, दत्तात्रेय बनसोडे, प्रशांत दानोळीकर, हरिश गजबे, वादिराज जहागिरदार, दीपक कुमठेकर, मिलिंद दिग्रसकर, मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके आदींची उपस्थिती होती.




निसर्ग नियमाप्रमाणे पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा असं ऋतुचक्र अव्याहतपणे सुरु असत. परंतु, जेंव्हा एक ऋतू संपून दुसरा ऋतू सुरु होतो तेंव्हा जे बदल वातावरणात घडतात ते सहज स्वीकारणं शरीरासाठी अवघड असत आणि त्यामुळेच अशा वातावरणाशी जुळवून घेण्यास शरीर अनुकूल नसल्यामुळेच आपल्याला आजारांना सामोरं जावं लागत.

विशेषतः पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात दूषित पाणी साचत आणि जलजन्य किंवा कीटकजन्य स्वरूपाचे आजार पसरतात. यापैकीच एक आजार म्हणजे डेंग्यू. अशा आजारांपासून बचाव करण्यासाठी काळजी नेमकी कशी घ्यायची? यावर प्रतिबंधात्मक स्वरूपाचे उपाय कोणते आहेत? याच संधर्भात बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक आणि डेंगू विकार तज्ञ डॉ. नागनाथ रेडेवार यांच्याशी साधलेला संवाद.

**पावसाळयात कीटकजन्य आजार देखील उद्भवतात ते नेमके कोणते?**
■ पावसाळ्यात दूषित पाणी मोठ्या प्रमाणात साचत आणि त्यातूनच अनेक प्रकारचे कीटकजन्य आजार उद्भवतात. अनेक प्रकारचे जे डास आहेत त्यामुळे मलेरिया, डेंगू,चिकनगुनिया आणि मेंदूज्वर असे आजार होतात. म
लेरियाचे शरीभागातील प्रमाण हे मागील ३ ते ४ वर्षांपासून खूपच कमी झालेले आहे मात्र विदर्भ आणि मराठवाडा भागात मात्र १०० पैकी ७० टक्के मलेरिया चे रुग्ण आढळता . डेंगू आणि मलेरिया हे आजार एडिस इजिप्त या जातीच्या मच्छरांमुळे होतात. या आजाराचा वाहक एकाच असल्यामुळे हे दोन्ही आजार होतात.

**डेंगू आणि मलेरिया या आजारामधील फरक नेमका कसा ओळखायचा ?**
■ गंमत अशी कि डेंगू आणि मलेरिया दोन्ही आजारात ताप हा येतो. डोकेदुखी, अंगदुखी अशी काही लक्षण सारखीच असतात. पण डेंगू मध्ये डोळे खूप दुखतात. मलेरिया किंवा डेंग्यूचा रुग्ण ओळखणं खूप कठीण असत. दोन तीन दिवसात लक्षण तपासून डॉक्टरांच्या निरीक्षणाखालीच हे आजारा नेमके काय आहते हे ओळखुन त्यावर योग्य ते उपचार करता येतात.

**आपल्याला जो डास चावलेला आहे तो साधा डास आहे कि डेंग्यूचा हे कसे ओळखायचे?**
■ १६ मे हा राष्ट्रीय डेंगू दिवस म्हणून पाळला जातो आणि त्याच अनुषंगाने आपण प्रशिक्षणाचा कार्यक्रम देखील राबवतो. शिवाय जुलै महिना डेंगू प्रतिरोध महिना म्हणूनदेखील पाळला जातो. डेंग्यूची अळी ओळखायची कशी? तर आपल्या घरात साचलेल्या पाण्याच्या टाकीत ज्या अळ्या असतात त्या अळ्यांच्या शरीरावर वाघाच्या शरीराप्रमाणे सफेद पट्टे असतात त्या अळ्या म्हणजे डेंग्यूच्या अळ्या असतात.

**डेंग्यूची आणि व्हायरल इन्फेक्शनची लक्षण कशी ओळखायची?**
डेंगू, फ्लू मध्ये ताप हा सारखाच असतो. डोकं दुखते,अंगावर पुरळ येतात आणि अंग देखील दुखते. व्हायरल आजारामध्ये सर्दी, खोकला देखील असतो. परंतु डेंग्यूच्या आजाराचं निदान लवकर होत नाही.

डेंग्यूची प्राथमिक लक्षण म्हणजे ताप येणं, डोकं दुखणं, डोळे दुखतात, अंगावर पुरळ येतात हि लक्षण तीन चार दिवस दिसतात. आठ ते दहा दिवसानंतर मात्र हि लक्षण गंभीर दिसतात कधीकधी हिरड्यांमधून किंवा शरीरांतर्गत रक्तस्त्राव होतो, लघवीतून रक्त जाते, अशा वेळी घरच्या घरी उपचार करण्यापेक्षा अशा रुग्णाला लगेच रुग्णालयात ॲडमिट करणंच उत्तम.

पॅरासिटॅमाल किंवा अस्पिरीन अशा गोळ्या घेतल्या तर शरीरांतर्गत रक्तस्त्राव वाढू शकतो. डेंग्यूच्या आजाराची अत्यंत गंभीर स्टेज म्हणजे पोटात काही न राहणे, मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होणे, लघवी कमी होणे अशी गंभीर लक्षणू दिसतात.

**डेंग्यूमध्ये शरीरातील प्लेटलेट्स कमी होतात म्हणजे नेमकं काय होत? डेंगूवर उपचार नेमके कोणते आहेत?**
■ मानवी शरीरात ३ प्रकारच्या पेशी असतात. लाला पेशी,पांढ्या पेशी आणि प्लेटलेट्स अर्थात रक्तपिण्डिका. या प्लेटलेट्स अर्थात रक्तपिंडिकांचा काम असत रक्त गोठविण्याचं. आपल्याला पडल्यानंतर,किंवा लागल्यानंतर याच रक्त पिंडिकांचं कार्य महत्वाचं असत.

व्हायरल इन्फेक्शन जेंव्हा होत तेंव्हा या प्लेटलेट्स बनण्याचा जो स्त्रोत असतो त्यावर परिणाम झाल्यामुळे प्लेटलेट्स कमी होतात त्यामुळेच डेंगू मध्ये शरीरातील या प्लेटलेट्स वाढविण्यासाठी प्रयत्न होतात. आपल्याकडे मलेरिया किंवा फ्लूवर अगदी लेप्टोस्पायरोसिस वर देखील उपचार आहेत मात्र डेंगू वर उपचार नाहीत. म्हणूनच ताप आला कि तो कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

शरीरात डिहायड्रेशन मोठ्या प्रमाणात होत ज्यामुळे पाण्याच प्रमाण कमी होत ते बहरून काढण्यासाठी भरपूर पाणी किंवा लिंबू पाणी पिन आणि सर्वात महत्वाचं म्हणजे भरपूर आराम करणं हेच प्रतिबंधात्मक स्वरूपाचे उपचार आहेत. मात्र डेंग्यूवर ठोस स्वरूपाचे उपचार नाहीत.

■ ■ ■

## डिजिटल दंतचिकित्सा क्षेत्रात एआय क्षमतांचा विस्तार



दंत उत्पादने देणारी कंपनी लक्ष्मी डेंटल लिमिटेडने घोषणा केली की त्यांच्या संचालक मंडळाने दंतचिकित्सा क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता अनुप्रयोगांवर लक्ष केंद्रित करणारी गुजरातस्थित आरोग्यसेवा तंत्रज्ञान कंपनी आयडीबीजी एआय डेंट ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेडमध्ये गुंतवणूक करण्यास मान्यता दिली आहे.

पूर्ण झाल्यानंतर, लक्ष्मी डेंटल लिमिटेड एआय डेंटमध्ये ५८% भांडवल धारण करेल. या संपादनाचे उद्दिष्ट कंपनीचे संशोधन आणि विकास मजबूत करणे आणि तिच्या तंत्रज्ञान ऑफरचा विस्तार करणे आहे. मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत उपक्रमांतर्गत देशांतर्गत उत्पादन आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन देण्यासाठी भारताच्या प्रयत्नांना देखील हे पाऊल समर्थन देते.

एआय जगभरात दंतचिकित्सा क्षेत्रात एक मूलभूत तंत्रज्ञान बनत आहे. निदानापासून ते उपचार नियोजनापर्यंत, एआय टूल्स निर्णय घेण्याचे आणि क्लिनिकल निकालांमध्ये सुधारणा करत आहेत. या गुंतवणुकीद्वारे, लक्ष्मी डेंटलचे उद्दिष्ट दंत काळजीसाठी एआयमध्ये स्थानिक क्षमता निर्माण करणे आहे, ज्यामुळे दंतवैद्यांना रुग्णांसाठी प्रक्रियात्मक गुंतागुंत कमी करताना जलद, डेटा-चालित प्रक्रिया स्वीकारण्यास सक्षम केले जाईल. दंतवैद्यांना सातत्यपूर्ण काळजी देण्यात मदत करणारी आणि रुग्णांना निदान आणि उपचारांमध्ये सुधारित प्रवेश, अचूकता आणि स्पष्टता प्रदान करणारी प्रणाली तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

लक्ष्मी डेंटल लिमिटेडचे अध्यक्ष आणि पूर्ण-वेळ संचालक राजेश खाखर म्हणाले, एआय हा दंतचिकित्सा क्षेत्रातील उत्क्रांतीचा पुढचा टप्पा आहे. जगभरातील क्लिनिकमध्ये काळजी कशी दिली जाते हे ते आकार देत आहे. एआय डेंटमधील आमची गुंतवणूक भारतीय दंतवैद्य आणि रुग्णांच्या जवळ आणण्यासाठी डिझाइन केलेली आहे. दंतवैद्यांना त्यांच्या कामात मदत करणारी आणि रुग्णांसाठी दंत भेटी सोप्या आणि अधिक समजण्यायोग्य बनवणारी साधने तयार करण्यावर आम्ही लक्ष केंद्रित केले आहे. हे केवळ डिजिटल अवलंबनाबद्दल नाही तर भविष्यासाठी दंतवैद्यांना तयार करण्याबद्दल आणि काळजी घेणाऱ्या प्रत्येक रुग्णासाठी अनुभव सुधारण्याबद्दल आहे.

■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## धर्माविरोधात जाल तर हाती शस्त्रही घेऊ..

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
मुंबईतील कबुतरखान्यांच्या परिसरात पक्ष्यांना खाद्य टाकण्यास उच्च न्यायालयाने घातलेली बंदी कायम ठेवल्यानंतर जैन समाज आक्रमक झाला आहे. कबुतरखाने सुरू ठेवण्यासाठी १३ ऑगस्टपासून उपोषणाला बसणार आहोत. वेळ पडल्यास शांतताप्रिय असणारा आमचा समाज शस्त्रही हातात घेईल आणि कोर्टाच्या आदेशालाही जुमानणार नाही, असा इशारा जैनमुनी नीलेशचंद्र विजय यांनी दिला आहे.
जैनमुनी नीलेशचंद्र विजय म्हणाले, आम्ही सत्याग्रह आणि उपोषणाचा मार्ग वापरणार आहोत. शस्त्र उचलणे हा आमचा स्वभाव नाही, पण धर्माविरोधात पाऊल उचलले गेले तर आम्ही गप्प बसणार नाही. आम्ही भारताचे संविधान, कोर्ट आणि सरकारला मानतो, परंतु आमच्या धार्मिक तत्त्वांवर गदा आणली तर आम्ही कोणालाही मानणार नाही.

# आईने वाचवले मुलीचे प्राण... आत्याने दिले भाच्याला जीवनदान!

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ११ :



येथील विभागीय संदर्भसेवा रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी) गेल्या दोन दिवसांत दोन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यात आईने आपल्या मुलीसाठी मूत्रपिंड दान करून तिचे प्राण वाचवले, तर आत्याने भाच्याला जीवनदान दिले. विशेष म्हणजे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या तब्बल ५८ शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत.

आशना तहसीन ही १८ वर्षीय रुग्ण मुलगी. चांदूर बाजार तालुक्यातील देऊरवाडा या लहानशा गावची. गेल्या तीन महिन्यांपासून डायलिसीस सुरू होते, पण त्रास कमी होत नव्हता. मूत्रपिंड प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय असल्याचे डॉक्टरांनी तिच्या कुटुंबीयांना सांगितले. मुलीच्या पुढील भविष्याचा विचार करून आई रुबीना परवीन यांनी आपले एक मूत्रपिंड हे मुलीला देण्याचा निर्णय घेतला. सुपर स्पेशालिटी रुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत ही शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी आणखी एक शस्त्रक्रिया पार पडली. बडनेरा येथील ४० वर्षीय मोहम्मद समीर यांच्यावर गेल्या वर्षभरापासून डायलिसीस उपचार सुरू होते. मूत्रपिंड प्रत्यारोपण हाच योग्य उपाय असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याची माहिती मोहम्मद साबीर यांच्या आत्या अब्रार बेगम अब्दूल सादिक (वय ६०) यांना मिळाल्यानंतर त्यांनी आपले एक मूत्रपिंड मोहम्मद समीर यांना देण्याचा निर्णय घेतला.

ही शस्त्रक्रिया देखील विनामूल्य करण्यात आली. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अविनाश चौधरी, डॉ. हितेश गुल्हाने, डॉ. राहुल पाटोडे, डॉ. विक्रम देशमुख, डॉ. प्रतीक चिरडे, डॉ. विशाल बाहेकर, डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ रमणिका ढोमणे, डॉ. शीतल सोळंके, डॉ. विक्रांत कुळमेथे, डॉ. माधव ढोपरे, डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय, डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव, शीतल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ. सोनाली चौधरी, डॉ. पायल रोकडे, डॉ. दिव्यानी मुंदाने यांच्यासह सूपर स्पेशालिटी रूग्णालयातील चमूचे सहकार्य लाभले.